cmyk

## संपादकीय

### स्थानिक स्वराज्य नेमकं कुठे आहे?

भारताच्या आर्थिक नकाशावर महाराष्ट्राची शहरं ही केवळ लोकसंख्येची केंद्रे नाहीत; ती राज्याच्या महसुलाची प्रमुख इंजिने आहेत. मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, ठाणे, नवी मुंबई, नाशिक आणि नागपूर या शहरांतील उद्योग, आयटी, उत्पादन, सेवा आणि बांधकाम क्षेत्र राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठा आधार देतात. महाराष्ट्राचा २०२५-२६ चा अर्थसंकल्प सुमारे ७ लाख कोटींचा होता, तर २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात राज्याचे स्वतःचे कर उत्पन्न सुमारे ४.१५ लाख कोटी इतके अपेक्षित आहे.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-११४ | मंगळवार दि.१४ जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### व्यापक 'कामगार हिताला' प्राधान्य द्या-मुख्यमंत्री

मुंबईः कामगारांसंबंधी विविध कायद्यांमध्ये कामगार विभागाच्या माध्यमातून सुधारणा करण्यात येत आहेत. या सुधारणांमधून व्यापक 'कामगार हित' जपण्याला प्राधान्य द्यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी कामगार कायद्यांच्या सुधारणा सादरीकरण बैठकीत दिले. केंद्रीय कामगार कायद्यांना सुसंगत राज्याची नियमावली बनविताना राज्याच्या हितासाठी काही सुधारणा करणे आवश्यक असल्यास त्या करण्यात याव्यात, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या. बैठकीस कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर उपस्थित होते. तर दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे कामगार राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी बैठकीत सहभाग घेतला. कायद्यातील सुधारणा करण्यात येणारी प्रत्येक बाब तपासून पाहण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, कामगार न्यायालयांऐवजी मुख्य न्याय दंडाधिकारी ही तरतूद करण्यात आली आहे.

### गुप्तहेर अधिकाऱ्याच्या हत्येप्रकरणी हुसेन दोषी

दिल्लीः २०२० मधील ईशान्य दिल्लीतील दंगलीदरम्यान गुप्तहेर विभागाचे अधिकारी अंकित शर्मा यांच्या हत्येप्रकरणी दिल्लीतील एका न्यायालयाने सोमवारी आम आदमी पक्षाचे माजी नगरसेवक ताहीर हुसेन याच्यासह इतर चौघांना दोषी ठरवले. मृत अधिकारी अंकित शर्मा यांचा मृतदेह नंतर एका नाल्यात सापडला होता. त्यांची ओळख लपवण्यासाठी त्यांचा चेहरा आणि शरिराचे इतर भाग ॲसिडने जाळण्यात आले होते. अंकित शर्मा यांचे वडील रवींद्र कुमार यांनी दिलेल्या तक्रारीवरून २६ फेब्रुवारी २०२० रोजी हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. कडकडडुमा न्यायालयाने ताहीर हुसेन हा दंगल घडवणे, हल्ला करणे, गुन्हेगारी बळाचा वापर आणि हत्या या आरोपांखाली दोषी आढळला आहे. या प्रकरणात नाव आल्यानंतर ताहीर हुसेन यांना आपमधून निलंबित करण्यात आले होते.

### खाऊँगा, खाने दूँगा और खिलाऊँगा मोदींचे धोरण

नवी दिल्लीः काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारवर भ्रष्टाचाराच्या विविध कथित प्रकरणांवरून जोरदार हल्लाबोल केला आहे. एक्सवरील एका विस्तृत पोस्टमध्ये त्यांनी २०१४ मध्ये पंतप्रधान मोदी यांनी दिलेल्या ना खाऊँगा, ना खाने दूँगा या घोषणेचा उल्लेख करत, ती प्रत्यक्षात फोल ठरल्याचा आरोप केला. रमेश यांनी म्हटले की, माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी नोटाबंदीला संघटित लूट आणि कायदेशीर दरोडा असे संबोधले होते. त्यानंतर गुजरातचे मुख्यमंत्री असताना झालेला २०,००० कोटींचा कथित घोटाळा लपवण्यासाठी जीएसपीसीचे ओएनजीसीमध्ये विलीनीकरण करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच, इलेक्टोरल बाँड योजना ही पुढे जाऊन 'चंदा दो, धंदा लो' असा ४ लाख कोटींचा कथित घोटाळा ठरल्याचा दावाही त्यांनी केला. याशिवाय, उद्योगपती गौतम अदानी यांच्या व्यावसायिक साम्राज्याचा झालेला विस्तार हा मोदी सरकारच्या कारभाराचे वास्तव दर्शवतो, असा आरोप करत काँग्रेसने 'हम अडानी के हैं कौन' या मोहिमेद्वारे पंतप्रधानांना विचारलेल्या १०० प्रश्नांची आठवण त्यांनी करून दिली.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१३ जुलै २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६३.०० क्विंटल | २,५५६ | २,७८१ | २,६५१ |
| ज्वारी/हायब्रिड : ७२.०० क्विंटल | २,३५१ | ४,२४० | २,९५३ |
| मका/लोकल: ३९.५० क्विंटल | २,००० | २,२४९ | २,१२४ |
| तूर : ४.५० क्विंटल | ६,४०० | ६,४०० | ६,४०० |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: १५७.५० क्विंटल | २,५०० | ३,१६० | २,८७४ |
| मुग: १.०० क्विंटल | ७,०६० | ७,०६० | ७,०६० |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| हरभरा: १७.०० क्विंटल | ४,५०१ | ५,७०० | ५,३६८ |

# कर्जमाफीसाठी आधार अनिवार्य; बँकांमध्ये माहिती अद्ययावत करण्याचे आवाहन

## ५६ लाख शेतकऱ्यांना ३६,५०० कोटींचा दिलासा; जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून लाभ वितरणाची तयारी

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची अंमलबजावणी आता अंतिम टप्प्यात पोहोचली असून, पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जमाफीची रक्कम थेट जमा करण्यासाठी सहकार विभागाने तयारी पूर्ण केली आहे. या योजनेचा लाभ कोणत्याही विलंबाशिवाय शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावा यासाठी सर्व पात्र शेतकऱ्यांनी आपली आधार क्रमांकाची माहिती संबंधित बँक शाखेत तातडीने अद्ययावत करावी, असे आवाहन सहकार विभागाने केले आहे.**



सहकार विभागाच्या नियोजनानुसार, पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण होताच जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून लाभाची रक्कम थेट त्यांच्या कर्ज खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांची आर्थिक मदत मिळणार असून, राज्याच्या इतिहासातील ही सर्वात मोठ्या कर्जमुक्ती योजनांपैकी एक मानली जात आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी सहकार आयुक्त व निबंधक कार्यालय तसेच जिल्हा बँकर्स समितीने व्यापारी, राष्ट्रीयीकृत, खासगी आणि सहकारी बँकांना आवश्यक सूचना दिल्या आहेत. पात्र शेतकऱ्यांचे आधार क्रमांक संकलित करून त्यांचे प्रमाणीकरण करण्याचे काम वेगाने सुरू आहे. आधार क्रमांक आणि कर्ज खात्याची माहिती अचूक असल्यास लाभ वितरणात कोणताही अडथळा येणार नसल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे. योजनेत पारदर्शकता आणि अचूकता राखण्यासाठी सर्व बँकांकडील पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यांची माहिती ऑनलाइन पोर्टलवर अपलोड केली जात आहे. माहिती पडताळणीनंतर प्रत्येक पात्र शेतकऱ्याला स्वतंत्र विशिष्ट कर्ज खातेनिहाय क्रमांक दिला जाणार आहे. या क्रमांकाच्या आधारे लाभार्थ्यांची अंतिम यादी तयार करण्यात येईल. पात्र शेतकऱ्यांची यादी संबंधित बँक शाखा, ग्रामपंचायत कार्यालय, तलाठी कार्यालय तसेच शासनाच्या अधिकृत पोर्टलवर प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आपले नाव आणि पात्रता सहज तपासता येणार आहे. नाव किंवा माहितीमध्ये त्रुटी आढळल्यास त्या दुरुस्त करण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून कर्जमाफीची रक्कम थेट संबंधित कर्ज खात्यात जमा केली जाणार आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी आधार, बँक खाते आणि

◀◀ पान २ वर

# सुनेत्रा पवारांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवडीला पक्षातूनच आक्षेप

## राष्ट्रीय सचिव सच्चिदानंद सिंह यांनी वकिलांमार्फत पाठविली नोटीस



मुंबई । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या पक्षातील राष्ट्रीय अध्यक्ष पदावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आलं आहे. विशेष म्हणजे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रीय सचिव सच्चिदानंद सिंह यांनी थेट वकिलांमार्फत नोटीस पाठवून प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याने पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. पक्षाच्या अध्यक्षांसह वरिष्ठ नेत्यांना ९ जुलै रोजी त्यांनी ही नोटीस बजावली असून, राष्ट्रीय अध्यक्ष पदाची निवडणूक पुन्हा घ्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष या नात्याने सुनेत्रा पवार, कार्यकारी अध्यक्ष म्हणून प्रपुल्ल पटेल आणि पक्षाचे सचिव म्हणून ब्रिजमोहन श्रीवास्तव यांना ही नोटीस बजावण्यात आली आहे. त्यात, २६ फेब्रुवारी २६ रोजी घेण्यात आलेली पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांची

◀◀ पान २ वर

### सिंह यांचे आक्षेप

२८ जानेवारीला अजित पवार यांचा मृत्यू झाला त्यानंतर १७ फेब्रुवारी २०२६ ला निवडणूक आयोगाला पक्षाकडून सुधारित घटना देण्यात आली ज्यामध्ये नव्याने राष्ट्रीय अध्यक्ष निवड होई पर्यंत प्रफुल पटेल जे पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आहेत यांच्याकडे राष्ट्रीय अध्यक्ष पदाचे अधिकार असतील असं नमूद करण्यात आलं होते. आता पर्यंत सुधारित संविधान पक्षासाठी लागू आहे. सुधारित संविधानानुसार कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल यांना सर्वाधिकार होते आणि त्यानुसार राष्ट्रीय कार्यकारणीची बैठक प्रफुल पटेल यांनी बोलावणे गरजेचे होते मग पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस ब्रिजमोहन श्रीवास्तव यांनी कोणत्या अधिकारात राष्ट्रीय कार्यकारणीची बैठक बोलावली.? राष्ट्रीय कार्यकारणीची बैठक २६ फेब्रुवारीला बोलवण्यासाठी १८ फेब्रुवारीला जे पत्र निवडणूक आयोगाला दिले त्यावर तत्कालीन राष्ट्रीय कार्यकारणीच्या सदस्यांची परवानगी घेण्यात आलेली नव्हती त्यामुळे राष्ट्रीय अध्यक्षांची निवड हा मोठा प्रश्न आहे.

# मतदार ओळखपत्र रद्द होणार

## व्हायरल मेसेजवर विश्वास ठेवू नका, निवडणूक आयोगाचा मोठा खुलासा

मुंबई । प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या नावाने वर एक बनावट संदेश आणि मोबाईल क्रमांक मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. या मेसेजद्वारे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण केला जात असून, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने त्यांच्या अधिकृत हँडलवरून महत्त्वपूर्ण माहिती दिली आहे.

सध्या व्हॉट्सॲपवर फिरणाऱ्या या बनावट मेसेजमध्ये असा दावा करण्यात आला आहे की, 'विशेष सखोल पुनरीक्षण २०२६ दरम्यान मतदारांच्या कागदपत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर विसंगती किंवा त्रुटी आढळल्या आहेत.




त्यामुळे संदेशात दिलेल्या विशिष्ट मोबाईल क्रमांकावर मतदारांनी त्वरित संपर्क साधावा. जर दिलेल्या वेळेत संपर्क केला नाही, तर मतदाराचे मतदार ओळखपत्र मतदार यादीतून हटवले किंवा रद्द केले जाईल.' या मेसेजसोबत निवडणूक आयोगाचा लोगो आणि काही मोबाईल क्रमांक देखील जोडण्यात आले आहेत, ज्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना तो अधिकृत संदेश असल्यासारखा वाटू शकतो. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्याकडून या व्हायरल मेसेजची गंभीर दखल घेण्यात आली आहे. त्याची सत्यता तपासल्यानंतर हा संपूर्ण प्रकार एक फसवणूक असल्याचे स्पष्ट झाले आहे. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या माहितीनुसार, 'व्हायरल मेसेजमधील दावा पूर्णपणे खोटा आहे. भारत निवडणूक आयोग किंवा मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांनी असा कोणताही मेसेज किंवा व्हॉट्सॲप क्रमांक जारी केलेला

◀◀ पान २ वर

# १२ लाख लाडक्या बहिणींची नावे वगळली?

## हा तर महिलांचा विश्वासघात, वडेट्टीवारांची टीका

मुंबई । प्रतिनिधी

राज्य सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून ९२ लाख महिलांची नावे वगळण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. यावरुन काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे. राजकीय हित साध्य झाले, आता लाडक्या बहिणींना विसरले! असे त्यांनी म्हटले आहे.

निवडणुकीपूर्वी लाडक्या बहिणी म्हणून ज्या महिलांना डोक्यावर घेतले, त्याच महिलांना सत्ता मिळताच योजनेतून बाहेरचा रस्ता दाखवला जात आहे. तब्बल ९२



लाख महिलांना या योजनेतून वगळण्याचा निर्णय हा महिलांच्या विश्वासघाताचा आणि राजकीय स्वार्थाचा कळस आहे. सत्ता मिळवण्यासाठी कोणतीही शहानिशा न करता सरसकट लाभ वाटण्यात आला, पण आता

◀◀ पान २ वर

### बीडः मतदार २६ लाख अपात्र संख्या २८ लाख?

लाडकी बहीण योजनेअंतर्गत आज काही राज्यातील जवळपास ९२ लाख लाडक्या बहिणी अपात्र ठरवण्यात आले विशेषता या अपात्र लाडक्या बहिणीमध्ये बीड जिल्ह्यातील महिलांची संख्या अधिक आहे मात्र समाज माध्यमावर जे काही आकडे फिरवले जातात ते अत्यंत चुकीचे आहेत जवळपास २८ लाख आकडा दाखवला जातो तसे पाहिले तर बीड जिल्ह्यातील मतदार संख्याच २६ लाख आहे मग हे २८ लाख महिला कुठून आणल्या या आकडेवारी बाबत अद्याप स्पष्टता मिळू शकली नाही.



## राम मंदिर ट्रस्टला सुप्रीम कोर्टाची नोटीस

दिल्ली । वृत्तसंस्था

अयोध्या श्रीराम मंदिर देणगी चोरी प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभाग द्वारे चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करणार्या याचिकेवरील सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (दि. १३ जुलै) केंद्र सरकार, उत्तर प्रदेश सरकार आणि राम मंदिर ट्रस्टला नोटिसा बजावल्या आहेत. तसेच राम मंदिरातील अर्पण चोरीच्या प्रकरणाच्या तपासाबाबत सद्यस्थितीचा अहवाल सादर करण्याचे आदेशउत्तर प्रदेशच्या एसआयटीला


◀◀ पान २ वर

# शिवसेना उबाठाचा सोनम वांगचुक, अभिजित दिपकेच्या आंदोलनाला पाठिंबा

## विद्यार्थी आंदोलनाला महाराष्ट्रातून पहिली राजकीय मदत शिवसेना उबाठाची, सीजेपीच्या मोर्चात सामील

मुंबई । प्रतिनिधी

जवळपास मागील १५-१६ दिवस झाले, नीट परिक्षेच्या पेपर फुटीप्रकरणी आणि विद्यार्थ्यांच्या आत्महत्ये प्रकरणी दिल्लीच्या जंतरमंतर येथे कॉकरोज जनता पार्टीचे आंदोलन आणि वातावरणीय कार्यकर्त्ये सोनम वांगचुक यांचे उपोषणाचे आंदोलन सुरु आहे. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी



आम आदमी पार्टी, तृणमूल काँग्रेसचे खासदार, कम्युनिस्ट पक्षाचे काही पदाधिकारी आणि काही कलावंतांनी स्वतःहून पुढे येत आहेत. मात्र आतापर्यंत अनेक गोष्टीत सर्वात पुढारलेले राज्य म्हणून ओळखले जाणाऱ्या महाराष्ट्रातून मात्र पुढे जाताना कोणी दिसत नव्हते. अखेर शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी सोनम वांगचुक आणि अभिजीत दिपके यांच्या आंदोलनाला पाठिंबा देत असल्याचे जाहिर केले.


◀◀ पान २ वर

### इतिहास माफ करणार नाही; सीजेपीचे देशाला खुले पत्र

दिल्लीतील जंतरमंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनाला तीन आठवडे पूर्ण झाले आहेत. शिक्षण व्यवस्थेतील कथित भ्रष्टाचार आणि नीट पेपरफुटी प्रकरणी उपोषण करणारे सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांची प्रकृती खालावली आहे. कॉकरोच जनता पार्टीने या पार्श्वभूमीवर देशवासीयांना उद्देशून एक खुलं पत्र लिहिले आहे. या पत्रातून पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते सौरव दास यांनी नागरिकांना मौन न बाळगता पुढे येण्याचे आवाहन केले आहे.

# शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वर्गात अपमानित करू नये

## ■ सुप्रीम कोर्टाचा स्पष्ट इशारा



दिल्ली । वृत्तसंस्था

विद्यार्थ्याच्या आत्महत्येशी संबंधित एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने शिक्षकांच्या वर्तनाबाबत महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले आहे. विद्यार्थ्यांना वर्गात सर्वांसमोर अपमानित करणे योग्य नसून, अशा वागणुकीचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

हे प्रकरण एका प्राध्यापकाने दाखल केलेल्या याचिकेशी संबंधित आहे. सुनावणीदरम्यान प्राध्यापकांच्या वतीने ज्येष्ठ वकील डी. एस. नायडू यांनी युक्तिवाद केला की, विद्यार्थ्याचा कथित अपमान हा आत्महत्येच्या जवळपास महिनाभर आधी झाला होता. त्यामुळे त्या घटनेला आत्महत्येचे थेट कारण मानता येणार नाही. वकिलांनी न्यायालयाला सांगितले की, विद्यार्थ्याच्या मृत्यूपूर्वी सुमारे एक तास आधी घडलेली दुसरी घटना अधिक महत्त्वाची होती. विद्यार्थ्याने एका मोबाईल ॲपद्वारे कर्ज घेतले होते आणि परवानगी न घेता एका प्राध्यापकाचे नाव हमीदार म्हणून दिले होते. त्यानंतर कर्ज वसुली करणाऱ्या एजंटांकडून त्याला सतत त्रास दिला जात होता. त्यामुळे मानसिक तणाव वाढल्याचा दावा त्यांनी केला. याचवेळी वकिलांनी असेही सांगितले की, विद्यार्थ्यांच्या हितासाठी काही वेळा शिक्षकांना कठोर भूमिका घ्यावी लागते. अशा प्रत्येक घटनेत फौजदारी कारवाई झाल्यास शिस्त राखण्याचा प्रयत्न करणाऱ्या शिक्षकांवर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. मात्र, न्यायमूर्ती संदीप मेहता यांनी या युक्तिवादावर महत्त्वपूर्ण टिप्पणी केली. ते म्हणाले, ''काळ बदलला आहे. आमच्या काळात शिक्षकांकडून मार किंवा कठोर वागणूक सामान्य मानली जात होती. पण आता परिस्थिती बदलली आहे.'' न्यायमूर्ती मेहता यांनी पुढे सांगितले की, एखाद्या विद्यार्थ्याचा वर्गात इतर विद्यार्थ्यांसमोर अपमान केल्यास त्याचा मानसिकतेवर खोल परिणाम होऊ शकतो. अशा प्रकारचे वर्तन स्वीकारार्ह नसल्याचा स्पष्ट मेसेज समाजात जाणे गरजेचे आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी सन्मानाने

◀◀ पान २ वर

## १० वी, १२ वी पुरवणी परीक्षेचा निकाल आज

पुणे । प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे जुन-जुलै २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी-बारावीच्या पुरवणी परीक्षेचा निकाल मंगळवार (दि. १४) दुपारी १ वाजता ऑनलाईन पद्धतीने जाहीर केला जाणार आहे. विद्यार्थ्यांना राज्य मंडळाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांचे विषयनिहाय गुण उपलब्ध करून दिले जाणार असल्याची माहिती राज्य मंडळाचे सचिव डॉ. दिपक माळी यांनी दिली आहे.**

राज्य मंडळाच्या नऊ विभागीय मंडळांमार्फत इयत्ता दहावीची पुरवणी परीक्षा १६ ते ३० जून दरम्यान तर बारावीची पुरवणी परीक्षा १६ जुन ते ८ जुलै दरम्यान घेण्यात आली. यंदा बारावीच्या परीक्षेसाठी १ लाख ४ हजार ४९४ विद्यार्थ्यांनी, तर दहावीच्या परीक्षेसाठी ४८ हजार ७२३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यंदा पहिल्यांदाच पुरवणी परीक्षा जुलै-ऑगस्ट ऐवजी जून-जुलै महिन्यातच घेण्यात आली. तसेच निकाल देखील लवकर लावला जात

◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# स्थानिक स्वराज्य नेमकं कुठे आहे?

भारताच्या आर्थिक नकाशावर महाराष्ट्राची शहरं ही केवळ लोकसंख्येची केंद्रे नाहीत; ती राज्याच्या महसुलाची प्रमुख इंजिने आहेत. मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, ठाणे, नवी मुंबई, नाशिक आणि नागपूर या शहरांतील उद्योग, आयटी, उत्पादन, सेवा आणि बांधकाम क्षेत्र राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठा आधार देतात. महाराष्ट्राचा २०२५-२६ चा अर्थसंकल्प सुमारे ७ लाख कोटींचा होता, तर २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात राज्याचे स्वतःचे कर उत्पन्न सुमारे ४.१५ लाख कोटी इतके अपेक्षित आहे. यातील सर्वात मोठा हिस्सा राज्य जीएसटीचा असून त्यानंतर स्टॅम्प ड्युटी, नोंदणी शुल्क, व्हॅट, उत्पादन शुल्क आणि वाहन कर यांचा क्रम लागतो. मात्र येथेच सर्वात मोठा प्रश्न उभा राहतो. या महसुलात सर्वाधिक योगदान देणाऱ्या शहरांना त्यांच्या विकासासाठी किती हिस्सा परत मिळतो? या प्रश्नाचे अधिकृत, शहरनिहाय उत्तर सरकारकडे सार्वजनिक स्वरूपात उपलब्ध नाही. याच कारणामुळे पारदर्शकतेची मागणी अधिक तीव्र होते.

भारतीय राज्यघटनेतील ७४ वी घटनादुरुस्ती ही केवळ महानगरपालिका निवडणुकांसाठी करण्यात आलेली नव्हती. तिचा मूळ हेतू स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिक आणि प्रशासकीय स्वायत्तता देणे हा होता. त्यासाठी प्रत्येक राज्यात राज्य वित्त आयोग स्थापन करून महसूल वाटपाची तत्त्वे निश्चित करण्याची घटनात्मक तरतूद करण्यात आली. अनेक वर्षांपासून राज्य वित्त आयोगांच्या शिफारशींची अंमलबजावणी विलंबाने होत असल्याची टीका होत आली आहे. नुकत्याच सहाव्या महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांना राज्याच्या कर महसुलातून अधिक सूत्रबद्ध आणि मोठा वाटा देण्याची शिफारस केली असून आर्थिक लेखापरीक्षण अधिक कठोर करण्याचाही आग्रह धरला आहे. म्हणजेच प्रश्न केवळ विरोधकांचा नाही; राज्याच्या वित्तीय व्यवस्थेचा अभ्यास करणाऱ्या आयोगालाही विद्यमान प्रणालीत सुधारणा आवश्यक वाटत आहेत. दुसरीकडे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांनी महाराष्ट्राच्या वित्तीय व्यवस्थेबाबत महसुली तूट, वाढते बांधील खर्च, अर्थसंकल्पीय नियोजनातील त्रुटी, ऑफ-बजेट कर्ज आणि निधी व्यवस्थापनातील पारदर्शकतेबाबत चिंता व्यक्त केली आहे. अशा परिस्थितीत एक मूलभूत प्रश्न विचारलाच पाहिजे. राज्याची आर्थिक परिस्थिती तणावाखाली असेल, तर शहरांच्या पायाभूत सुविधांवरील गुंतवणूक आणखी मागे पडणार नाही का? आज भारताच्या जिडीपी मध्ये शहरी भागाचे योगदान ६० टक्क्यांहून अधिक असल्याचे विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अभ्यास सातत्याने दर्शवतात. आर्थिक वाढ शहरांतून होते, पण आर्थिक निर्णयांचे केंद्रीकरण मंत्रालयात राहते. याचा अर्थ राज्य सरकारने सर्व पैसा शहरांवरच खर्च करावा, असा अजिबात नाही. ग्रामीण भाग, मागास प्रदेश, सिंचन, शेती, आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक न्याय यांवर खर्च करणे ही राज्याची घटनात्मक जबाबदारी आहे. पण त्याच वेळी कर निर्माण करणाऱ्या शहरांनाही पुरेशा आणि पूर्वनियोजित निधीची हमी असली पाहिजे. आज परिस्थिती अशी आहे की अनेक महानगरपालिका मोठ्या पाणीपुरवठा योजना, सांडपाणी प्रक्रिया, सार्वजनिक वाहतूक, पूरनियंत्रण आणि रस्त्यांच्या प्रकल्पांसाठी राज्याच्या मंजुरीची वाट पाहतात. हा प्रश्न केवळ पैशाचा नाही. हा प्रश्न स्थानिक स्वराज्याच्या विश्वासार्हतेचा आहे. जर प्रत्येक मोठ्या निर्णयासाठी महानगरपालिकांना मंत्रालयाकडे जावं लागत असेल, तर त्या खऱ्या अर्थाने स्वायत्त संस्था कशा? लोकशाहीत कर हा फक्त पैसा नसतो; तो विश्वासाचा करार असतो. म्हणून आजचा खरा प्रश्न सरकारविरोधात किंवा महानगरपालिकांविरोधात नाही. प्रश्न इतकाच आहेज्या शहरांमुळे राज्याची तिजोरी भरते, त्या शहरांना त्यांच्या भविष्यासाठी आर्थिक स्वायत्तता कधी मिळणार.? यासाठी काही सुधारणा स्पष्ट आहेत जशा की, राज्य वित्त आयोगाच्या शिफारशी वेळेत आणि पूर्णपणे लागू करणे. शहरनिहाय ''महसूल विरुद्ध खर्च'' असा वार्षिक सार्वजनिक अहवाल प्रसिद्ध करणे. महानगरपालिकांना स्थिर महसूल स्रोत उपलब्ध करून देणे. महानगरपालिका रोखे, मालमत्ता कर सुधारणा आणि डिजिटल महसूल व्यवस्थापन अधिक प्रभावी करणे आणि सर्वांत महत्त्वाचंकर भरणाऱ्या नागरिकांना त्यांच्या शहराच्या आर्थिक स्थितीचा पारदर्शक हिशोब देणे. मात्र यावर विचार होण्याची गरज आहे.

---

# राजेगावच्या उसाच्या शेतात कुजलेल्या अवस्थेत आढळला किरण राठोड यांचा मृतदेह

## हत्या की आत्महत्या? पोलिसांचा तपास सुरू



**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील राजेगाव परिसरातील उसाच्या शेतात कृष्णा (किरण) गणपत राठोड रा. माली पारगाव तांडा, वय अंदाजे ५२ ते ५४ वर्षे यांचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांनी मृताची ओळख अधिकृतरीत्या पटविली असून, मृत्यू नेमका कशामुळे झाला याचा तपास सुरू आहे.

प्राथमिक माहितीनुसार, मृतदेह सुमारे तीन ते चार दिवसांपूर्वीचा असावा, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. मृत व्यक्तीच्या अंगावर केवळ अंडरवेअर आणि बनियान असल्याची माहिती असून, दोन्ही हात पाठीमागे असल्याचेही समोर आले आहे. या सर्व बाबींचा तपास पोलीस करत आहेत.घटनेची माहिती मिळताच माजलगाव ग्रामीण पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला असून, शवविच्छेदना साठी पाठवला आहे. शवविच्छेदन अहवाल आणि इतर तपासातील निष्कर्षानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. त्यामुळे हा मृत्यू हत्या, आत्महत्या किंवा अन्य कोणत्या कारणामुळे झाला, याबाबत अद्याप कोणताही अधिकृत निष्कर्ष समोर आलेला नाही. या प्रकरणाचा सर्व बाजूंनी तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

---

# महावितरणच्या अनागोंदी कारभाराविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बोंबाबोंब आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील महावितरणच्या अनागोंदी कारभार, कागदोपत्री मान्सूनपूर्व दुरुस्ती, ऐच्छिक असतानाही स्मार्ट मीटरची सक्ती, विजेच्या धक्क्याने झालेल्या माऊली गोंडे आणि कृष्णा उगले या दोन शेतकऱ्यांच्या मृत्यूची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई तसेच त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत आणि गेवराई उपविभागीय कार्यालयांतर्गत ५ कोटी रुपयांच्या घोटाळ्याची चौकशी करून दोषींवर करण्याच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली आज सोमवारी (दि.१३) जिल्हाधिकारी**




**कार्यालयासमोर महावितरणविरोधात घोषणाबाजी करत बोंबाबोंब आंदोलन करण्यात आले.**

आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा पवार, महावितरणचे कार्यकारी संचालक (मुंबई) आणि मुख्य अभियंता, महावितरण परिमंडळ, लातूर यांना निवेदन देण्यात आले. चिंचोटी (ता. वडवणी) येथील माऊली दिलीप गोंडे (वय २६) व हाजीपूर (ता. शिरूर कासार) येथील कृष्णा मच्छिंद्र उगले (वय ३०) यांच्या विजेच्या धक्क्याने झालेल्या मृत्यूची सखोल चौकशी करावी.संबंधित दोषींवर कठोर कारवाई करून मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत द्यावी. मान्सूनपूर्व दुरुस्तीच्या नावाखाली झालेल्या कामांची चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी. ऐच्छिक असलेल्या स्मार्ट मीटरची सक्ती तात्काळ थांबवावी. गेवराई उपविभागीय कार्यालयातील कथित ५ कोटी रुपयांच्या घोटाळ्याची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करावी. आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनूस, शेख मुबीन, शेख मुस्ताक, सामाजिक कार्यकर्ते रामनाथ खोड, बाळासाहेब मोरे पाटील (प्रांताध्यक्ष, शिवशक्ती-भीमशक्ती विचारमंच), माजी सैनिक अशोक येडे (जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी), सय्यद सादेक ( बीड शहराध्यक्ष आम आदमी पार्टी बीड),रामन जमाले (जिल्हाध्यक्ष, इंटक), प्राचार्य डी. जी. तांदळे (मार्गदर्शक, मराठवाडा शिक्षक संघ), ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे, सामाजिक कार्यकर्ते भिमराव कुटे, हनुमान घोडके, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते एल.आर. चाटे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा मार्गदर्शक तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे यांच्यासह विविध सामाजिक व राजकीय संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले. यावेळी डॉ. गणेश ढवळे यांनी बीड शहरातील रस्त्यांच्या मध्यभागी असलेले वाहतुकीस अडथळा ठरणारे रोहित्र व वीज खांब तातडीने सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्याची मागणीही केली. तसेच महावितरणच्या कामकाजात पारदर्शकता आणून नागरिकांच्या जीविताशी संबंधित प्रश्नांबाबत प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

---

# जिजामाता उद्यान फूड कॉम्प्लेक्स परिसरात पार्किंगची व्यवस्था करा; राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे निवेदन

**परळी वै.। प्रतिनिधी**

**परळी शहरातील जिजामाता उद्यान फूड कॉम्प्लेक्स परिसरात वाढत्या वाहतूक कोंडीचा प्रश्न लक्षात घेऊन स्वतंत्र पार्किंग व्यवस्था उपलब्ध करून द्यावी व वाहतूक सुरळीत करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्या वतीने नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.**



पक्षाचे शहर अध्यक्ष महादेव सोपानराव गंगणे पाटील यांनी सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, जिजामाता उद्यान परिसरात फूड कॉम्प्लेक्स सुरू झाल्यानंतर चारचाकी, दुचाकी व तीनचाकी वाहनांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ वाढली आहे. मात्र, स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था नसल्याने वाहनधारकांना रस्त्यावरच वाहने उभी करावी लागत आहेत. त्यामुळे परिसरात वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत असून रुग्णवाहिका, भाविक, नागरिक तसेच इतर वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सदर परिसरात पुरेशी पार्किंग व्यवस्था निर्माण करून वाहतुकीचे योग्य नियोजन करण्यात यावे, जेणेकरून नागरिकांची गैरसोय दूर होईल आणि वाहतूक सुरळीत राहील, अशी मागणी निवेदनातून राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष महादेव सोपानराव गंगणे पाटील युवा नेते श्रीनिवास राऊत कार्याध्यक्ष बद्दर भाई उपाध्यक्ष बाबा शेख यांनी या निवेदनातं मागणी केली आहे. या निवेदनाची दखल घेऊन नगर परिषद प्रशासनाने तातडीने आवश्यक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

---

# एपीआय साहेबांना जमेना...एसपी साहेब, तुम्हीच युसूफवडगांवचा मटका बंद करा.!

**युसूफवडगांव। प्रतिनिधी**

**तालुक्यातील युसूफवडगांव पोलीस ठाण्यापासून अवघ्या शंभर मीटर अंतरावर दोन अवैध मटका बुकी राजरोसपणे सुरू असताना त्या बंद करण्यात स्थानिक पोलिसांना अपयश येत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. अनेक वर्षांपासून गावात दोन ठिकाणी सुरू असलेल्या मटका अड्ड्यांवर प्रभावी कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे आता जिल्हा पोलीस अधीक्षकांनी स्वतः हस्तक्षेप करून युसूफवडगांव मटकामुक्त करावे,अशी जोरदार मागणी होत आहे.**

काही दिवसांपूर्वी युसूफवडगांव पोलीस ठाण्यात बदली होऊन आलेले नवनियुक्त अधिकारी म्हणून मांजरमे साहेब यांनी पदभार स्वीकारल्यानंतर गावकऱ्यांना अवैध धंद्यांवर आळा बसेल, अशी अपेक्षा होती. मात्र, मटका व्यवसाय आजही पूर्ववत सुरू असल्याने नागरिकांचा भ्रमनिरास झाला आहे. पोलीस ठाण्याच्या इतक्या जवळ सुरू असलेल्या या अवैध धंद्याकडे दुर्लक्ष का केले जात आहे, असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.मटका हा केवळ जुगार नसून अनेक कुटुंबांच्या उद्ध्वस्त होण्यामागील प्रमुख कारण ठरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. झटपट पैसे कमावण्याच्या हव्यासापोटी अनेक युवक या व्यसनाच्या आहारी जात असून, त्याचा परिणाम कुटुंबांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीवर होत आहे. त्यामुळे या अवैध व्यवसायावर कायमचा पडदा टाकण्याची वेळ आल्याचे मत व्यक्त होत आहे. युसूफवडगांव मटकामुक्त करण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षकांनी स्वतः लक्ष घालून विशेष मोहीम राबवावी, संबंधित मटका चालकांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी आणि गावातील अवैध व्यवसाय कायमस्वरूपी बंद करावा,तसेच त्यांना पाठीशी घालणाऱ्यांवर सुद्धा कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे केली आहे. एपीआय साहेबांना जमेना... एसपी साहेब, तुम्हीच युसूफवडगांवचा मटका बंद करा, अशी भावना आता गावकरी व्यक्त होत करत आहेत.

---

# पान १ वरून...

### कर्जमाफीसाठी आधार अनिवार्य;

कर्ज खात्याची माहिती अद्ययावत ठेवणे अत्यावश्यक असल्याचे सहकार विभागाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना चालू खरीप हंगामासाठी नव्याने पीक कर्ज उपलब्ध करून देण्याच्या सूचना सर्व बँकांना देण्यात आल्या आहेत. कर्जमाफीमुळे पात्र शेतकऱ्यांची पत पुन्हा पूर्ववत होणार असून, त्यांना वेळेवर नवीन पीक कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. यामुळे खरीप हंगामातील शेतीकामांना आवश्यक आर्थिक पाठबळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सहकार विभागाने सर्व पात्र शेतकऱ्यांना शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले असून, आधार प्रमाणीकरण, कागदपत्रांची पडताळणी आणि बँक खात्याची माहिती अद्ययावत ठेवणे या प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्यामुळे कर्जमाफीचा लाभ कोणत्याही विलंबाशिवाय थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्यास मदत होईल.

---------------

### मतदार ओळखपत्र

नाही,' असे स्पष्ट केले आहे. तसेच, 'निवडणूक आयोग किंवा मुख्य निवडणूक अधिकारी कोणत्याही मतदाराला वैयक्तिक रित्या व्हॉट्सअॅपवर अशा प्रकारच्या नोटीस अथवा धमक्यावजा संदेश पाठवून कागदपत्रांची मागणी करत नाहीत,' असाही खुलासा केला आहे. व्हायरल होत असलेल्या या संदेशाची भाषा, त्याचे स्वरूप आणि त्यामध्ये करण्यात आलेला अधिकाऱ्यांचा उल्लेख हा निवडणूक आयोगाच्या अधिकृत आणि शासकीय पद्धतीशी अजिबात सुसंगत नाही. त्यामुळे हा संदेश सायबर गुन्हेगारांचे कृत्य असण्याची दाट शक्यता आहे,' अशी सतर्कता व्यक्त करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने मतदारांना सतर्क राहण्याचे आणि कोणत्याही प्रकारच्या फसवणुकीला बळी न पडण्याचे आवाहन केले आहे. निवडणूक आयोगाने म्हटले आहे की, अशा कोणत्याही बनावट आणि संशयास्पद संदेशांवर नागरिकांनी अजिबात विश्वास ठेवू नये. मेसेजमध्ये दिलेल्या अनोळखी किंवा संशयास्पद मोबाईल क्रमांकांवर संपर्क साधण्याची चूक करू नका. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, अशा कोणत्याही कॉल किंवा मेसेजवर स्वतःची वैयक्तिक माहिती, आधार कार्ड, पॅन कार्ड किंवा इतर महत्त्वाची कागदपत्रे शेअर करू नका, कारण यामुळे आर्थिक फसवणूक किंवा डेटा चोरी होऊ शकते.'

---------

### सुनेत्रा पवारांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी

निवडणूक ही अवैध असल्याचे म्हणत ती रद्द करून पुन्हा निवडणूक घेण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली आहे. याबाबत स्वतंत्र आणि नि:पक्षपाती असा निवडणूक अधिकारी नेमून त्यांच्या मार्फत निवडणूक घेण्यात यावी. तोपर्यंत राष्ट्रीय अध्यक्ष आणि सुधारीत ऑफिस बेअररची यादी देखील रद्द समजावी, असेही नोटीसमध्ये बजावण्यात आले आहे. २६ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादीच्या सर्वसाधारण सभेत प्रफुल पटेल यांच्याकडूनच ही घोषणा करण्यात आली होती. मात्र, आता या निवडीला आक्षेप घेत सुनेत्रा पवार यांना नोटीस बजावण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर २०२३ मध्ये अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले होते. मात्र, २८ जानेवारी रोजी विमान अपघातात अजित पवारांचे निधन झाले, त्यानंतर, राष्ट्रवादीचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षाच्या बैठकीत सुनेत्रा पवारच राष्ट्रीय अध्यक्ष असल्याची घोषणा केली. पटेल यांनी पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत याबाबतचा प्रस्ताव मांडला, त्यास सर्वानुमते सहमती दर्शवण्यात आली. त्यामुळे, सुनेत्रा पवार यांच्याकडे उपमुख्यमंत्रीपदासह पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाचीही जबाबदारी देण्यात आली आहे. मात्र, आता याच निवडीला राष्ट्रवादी पक्षातूनच आक्षेप घेण्यात आला आहे. ज्या व्यक्तीने नोटिस पाठवली त्याने केवळ प्रसिद्धीसाठी हे केलेलं आहे, सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवड कायद्याला धरून आहे, असे राष्ट्रवादीचे सरचिटणीस सूरज चव्हाण यांनी म्हटले. राष्ट्रीय कार्यकारिणीत अध्यक्ष पदाची निवड झाल्यानंतर राष्ट्रीय अध्यक्षाला इतर निवडीचा अधिकार असतो, त्यानुसार प्रफुल पटेल यांची राष्ट्रीय कार्याध्यक्ष आणि सुनील तटकरे यांची महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष म्हणून निवड प्रक्रिया पार पडली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष निवडीवेळी नव्या संविधानाचा दाखल दिलेला आहे, तो चुकीचा आहे लवकरच आम्ही याबाबत बोलणार आहोत, असेही सूरज चव्हाण यांनी स्पष्ट केले.

----------

### शिवसेना उबाठाचा सोनम वांगचुक,

प्रत्येक राजकीय पक्षांनी देशभर ह्या आंदोलनाच्या समर्थनार्थ काहीतरी करणे गरजेचे आहे. कारण जोपर्यंत देश जागा होत नाही तोपर्यंत बेफिकीर सत्ताधाऱ्यांना त्यांची जागा कळणार नाही. मी शिवसेनेतर्फे सोनम वांगचुक आणि अभिजित दिपके ह्यांच्या आंदोलनाला पाठींबा जाहीर करत असल्याचे शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी सांगितले. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, सोनम वांगचूक, अभिजित दिपके आणि त्यांचे सहकारी युवक कुणासाठी लढताहेत? देशातील पालकांनी पण जागे झाले पाहिजे, हा देशाचा विषय आहे याची आठवणही यावेळी त्यांनी करून दिली. उद्धव ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, अभिजित दिपके हा दिल्लीमध्ये देशातील युवकांचा आवाज उठवतोय. २० तारखेला होणाऱ्या त्यांच्या आंदोलनासंदर्भात त्याने दावा केला आहे की, ह्या आंदोलनउात काही गुंड सोडून आंदोलन उधळण्याचा काहींचा प्रयत्न आहे. हे हिणकस आणि नीच वृत्तीचे लक्षण आहे, अशी टीका करत नीट परीक्षेच्या पेपरफुटीचे केंद्र महाराष्ट्रातच आहे; असे म्हटल्यावर आणि मुख्यमंत्र्यांना महाराष्ट्र द्रोह वाटू शकतो, असा उपरोधिक टोलाही यावेळी लगावला. उद्धव ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, पालक संतापलेले आहेत. मुलांचे संपूर्ण शिक्षण आणि त्यांच्या पालकांची आयुष्यभराची संपूर्ण कमाई बरबाद झाली आहे; त्याचेही कोणाला काही पडलेले नाही. लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान होत असेल तर धर्मेंद्र प्रधान ह्यांचा राजीनामा घेऊन त्या ठिकाणी सक्षम व्यक्तीची नेमणूक केली गेली तर त्यात कमीपणा मानण्याचे कारण काय? असा उपरोधिक सवालही यावेळी केंद्र सरकारला त्यांनी केला. पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, सत्ताधारी पक्षाला इतर पक्ष फोडण्यात जास्त रस आहे पण जिथे देशो नशीब फुटतेय, विद्यार्थी आत्महत्या करताहेत; त्यांच्याकडे लक्ष द्यायला त्यांना वेळ नाही. नीट परीक्षेचे पेपर फुटले, त्यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली, पण सरकारने त्यांच्याकडे लक्ष दिलेले नाही अशी आठवणही यावेळी करून दिली. शेवटी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, मी हात जोडून विनंती करतो, सोनम वांगचुकजी आपल्यासारखी माणसं देशाला हवी आहेत. हे सरकार असंवेदनशील आहे. आपल्यासारखी लोक राहिली काय किंवा राहिली नाही सरकारला काही फरक पडत नाही. तुमच्या बुद्धिमत्तेची देशाला गरज आहे, उपोषण सोडा, असे आवाहनही यावेळी ठाकरे यांनी केले.

---------

### राम मंदिर ट्रस्टला सुप्रीम

दिले. श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टलाही नोटीस बजावण्यात आली. आता सर्वोच्च न्यायालय या प्रकरणावर २० जुलै रोजी सुनावणी करणार आहे. अयोध्या श्रीराम मंदिर देणगी चोरी प्रकरणी दाखल याचिकेवर सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी खंडपीठाने उत्तर प्रदेश सरकारने या प्रकरणाच्या तपासासाठी स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाला आतापर्यंत झालेल्या तपासाचा प्रगती अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. या एसआयटीमध्ये कोणकोणते अधिकारी समाविष्ट आहेत, याची माहितीही अहवालात देण्यास सांगण्यात आले आहे. केंद्र आणि राज्य सरकारची बाजू मांडणारे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी हा स्टेटस रिपोर्ट बंद पाकिटात सादर केला जाईल, असे न्यायालयाला सांगितले. सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी मागणी केली की, यूपी सरकारने दाखल करावयाच्या स्टेटस रिपोर्टची एक प्रत त्यांनाही मिळावी. मात्र, न्यायालयाने सध्या ही मागणी फेटाळली. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी स्पष्ट केले, ''आम्ही यावर नंतर विचार करू. हा सध्या सुरू असलेला तपास आहे.'' तसेच, मंदिर ट्रस्टला नोटीस बजावणे तूर्तास लांबणीवर टाकावे, ही सॉलिसिटर जनरल यांची विनंतीही खंडपीठाने अमान्य केली.

------------

### ९२ लाख लाडक्या बहिणींची

वेगवेगळे निकष लावून महिलांना अपात्र ठरवले जात आहे. जर त्या महिला अपात्र होत्या, तर त्यांना आधी लाभ का देण्यात आला? आणि जर त्या पात्र होत्या, तर आता त्यांना वगळण्याचे कारण काय? या योजनेवर १४ हजार कोटी रुपयांचा खर्च झाला. या पैशांच्या नियोजनातील गोंधळ, चुकीचे निकष आणि राजकीय फायद्यासाठी केलेल्या निर्णयांचा हिशोब कोण देणार? असा सवाल वडेट्टीवार यांनी केला आहे. महिलांच्या भावनांशी खेळ करून, त्यांच्या नावावर राजकारण करून आणि सत्ता मिळताच त्यांना वाऱ्यावर सोडण्याचे काम महायुती सरकारने केले आहे. लाडक्या बहिणींसाठी नव्हे, तर मतांसाठी योजना होती का? हा प्रश्न आज प्रत्येकाच्या मनात आहे! असेही त्यांनी नमूद केले आहे. वृत्तानुसार, लाडकी बहीण योजनेअंतर्गत नोंदणी केलेल्या प्रत्येकी १० महिलांपैकी जवळपास ४ महिलांना पडताळणीच्या प्रक्रियेनंतर या योजनेतून वगळले आहे. यातील बहुतांश जवळपास ६२ लाख महिला लाभार्थ्यांनी ई- केवायसी प्रक्रिया केली नसल्याने या योजनेतून वगळण्यात आले आहे.

**सत्तेतील सावत्र भावांचा ३५०० कोटी रुपयांचा दरोडा – हर्षवर्धन सपकाळ**

भारतीय जनता पक्षाच्या सरकारने असा एकही विभाग अथवा क्षेत्र सोडले नाही जेथे भ्रष्टाचार केला नाही. 'जाऊ तिथे खाऊ' या म्हणीप्रमाणे केवळ भ्रष्टाचारच केला आहे. राम मंदिरातील भक्तांच्या देणगीवर दरोडा टाकून भाजपा आरएसएसवाल्यांचे पोट भरले नाही म्हणून की काय त्यांनी 'लाडकी बहिण' योजनेवरही दरोडा टाकला आहे. सत्तेतील सावत्र भावांनी बहिणींनाही सोडले नाही. हे सरकार आहे का दरोडेखोरांची टोळी? असा घणाघाती हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.

----------

### १० वी, १२ वी पुरवणी

असल्याचे स्पष्ट झाले आहे. विद्यार्थ्यांना मंगळवारी दुपारी १ वाजल्यापासून संकेतस्थळावरून निकालाची प्रत डाऊनलोड करून त्याची प्रिंट घेता येईल. विद्यार्थ्यांना गुण पडताळणी , उत्तरपत्रिकेच्या छायाप्रत व पुनर्मूल्यांकन या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. विद्यार्थी गुणपडताळणी व छायाप्रतीसाठी १५ ते २४ जुलै दरम्यान ऑनलाईन पद्धतीने अर्ज करू शकतील.

---------------------

### शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वर्गात

आणि संवेदनशीलतेने वागणे ही काळाची गरज असल्याचेही न्यायालयाने नमूद केले. या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करत, शिक्षण संस्थांमध्ये शिस्त आणि विद्यार्थ्यांचा सन्मान या दोन्ही गोष्टींचा समतोल राखणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

-------------

cmyk

## श्रीस्वामी समर्थ केंद्रात रुद्र शिवमहिमा जलाभिषेक

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री स्वामी समर्थ केंद्र शाहू नगर यांच्या वतीने माजलगावच्या श्री मंगलनाथ मंदिरात रूद्र शिवमहीम्म जलाभिषेक पर्जन्यसुक्त सेवा घेण्यात आली मराठवाडात महाराष्ट्र काही जिल्ह्यात व विशेषतः आपल्या बीड जिल्ह्यात यावर्षी पावसाचे प्रमाण खूप कमी असल्याने पाऊस पडण्यासाठी भगवान महादेवास रुद्र शिवमहिम्म जलाभिषेक व पर्जन्यसुक्त सेवा घेऊन साकडे घालण्यात आले. ही सेवा विविध केंद्रात ग्राम अभियाना अंतर्गत उपक्रम सुरू आहेत. श्री.स्वामी समर्थ केंद्र शाहुनगर केंद्राच्या वतीने आयोजित करण्यात आली होती या साठी शंभरा पैक्षा जास्त पुरुष सेविकरी व महिला सेविकरी उपस्थित होते.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार, दि. १४ जुलै २०२६



# जिल्ह्यात दुष्काळजन्यस्थिती : वारकरी निघाले पंढरीला

## श्री.क्षेत्र नारायणगड, भगवानगड, गहिनीनाथगड, मच्छिंद्रनाथगडाच्या माध्यमातून लाखो भाविकांचे पंढरपूरकडे प्रस्थान

शिरूर । प्रतिनिधी

अल निनोचा प्रभाव अद्याप राहिल्यामुळे पावसाविना बीड जिल्ह्यामध्ये दुष्काळ जन्यस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांनी कोरड्या मातीतच खरीप हंगामाची पेरणी करून पुन्हा एकदा नशीब आजमावण्याचा डाव मांडला आहे. पावसाळा सुरू होऊन दीड महिना संपत आली तरी दमदार पावसाविना सान पिके कोमेजून जाऊ लागली आहेत. मनामध्ये दुःखाचे काहूर मातले आहे. असे असले तरी शेतकरी वारकऱ्यांच्या मनातील पंढरपूरच्या पांडुरंगा बद्दलची श्रद्धा शेतकऱ्यांना स्वस्थ बसू देत नाही. प्रति वर्षाप्रमाणे किंबहुना प्रतिवर्षाच्या तुलनेत यावर्षी अधिकच्या संख्येने शेतकरी, वारकरी, भाविक भक्त श्री.क्षेत्र नारायणगड, श्री क्षेत्र भगवानगड, श्री.क्षेत्र गहिनीनाथ गड, श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथगड या गडासह जिल्ह्यातील छोट्या-मोठ्या संस्थान माध्यमातून निघणाऱ्या दिंड्यामध्ये सहभागी होऊन टाळ मृदंगाच्या नादामध्ये 'ज्ञानोबा तुकोबा'चा जयघोष करत पंढरीकडे प्रस्थान करू लागले आहेत.

बीड जिल्ह्यामध्ये गतवर्षीप्रमाणे याही वर्षी मृग नक्षत्रामध्येच खरीप हंगामाचे पेरणी होईल अशी अपेक्षा होती. ऊन -तहाने तमा न बाळगतात शेतकऱ्यांनी पूर्वमशक्तीची कामे उरकून घेतली होती. थोडाफार पाऊस झाला म्हणजे पेरणी होईल आणि थोड्या-थोड्या पावसावरती पिके जगतील असा शेतकऱ्यांनी समज मनाशी बांधून खरीप हंगामाच्या पेरणी करून घेतली . मात्र बीड जिल्ह्यामध्ये जो पाऊस आतापर्यंत झाला त्या पावसाने शेतामध्ये गेल्या नंतर चिखलानी पाय भरतील एवढाच दोन-तीन वेळा पाऊस पडला. आता गेल्या चार-पाच दिवसापासून पुन्हा पावसाची उघडीप सुरू झाली आहे. वारे सुटले आहे. हे सुटलेले वारे शेतकऱ्याच्या मनात मोठे काहूर निर्माण करीत आहे. पुरेशा पावसाविना जिल्ह्यामध्ये दुष्काळ जन स्थिती आहे. याला शिरूर कासार तालुका अपवाद नाही. पाऊस पडेल आणि पिके येथील या अशा वरती शेतकऱ्यांनी मोठ्या मागामोलाचे बी -बियाणे खरेदी करून पेरणी केली आहे. मात्र सद्यस्थिती दुष्काळजन्य स्थिती निर्माण झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या मनामध्ये निराशा वाटू लागली आहे.

अशातच आषाढी एकादशीनिमित्त पंढरीची वारी आली आहे. या वारीनिमित्त दिंडीमध्ये सहभागी होऊन पंढरीला जावे आणि विठुरायाला साकडे घालावे असे शेतकरी भक्तांच्या मनामध्ये येऊ लागल्याने यावर्षी दरवर्षीच्या तुलनेत शिरूर कासार तालुक्यातूनच नव्हे तर संपूर्ण बीड जिल्ह्यातून शेतकरी वारकऱ्यांची संख्यामध्ये लक्षनीय वाढत असल्याचे चित्र दिसू लागले आहे.



### मच्छिंद्रगडाच्या दिंडी हजारो भाविकांचे प्रस्थान

श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचा वै. निगमानंद महाराज यांच्या प्रेरणेतून निघणारा आषाढी एकादशीनिमित्त पायी दिंडी सोहळा आज महंत जनार्दन महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाला आहे. या सोहळ्यामध्ये हजारो भाविकांनी सहभाग घेतल्यामुळे सोहळ्याला मोठी रंगत आली आहे. दिंडी सोहळ्यामध्ये संगीत वाद्याचे पथक,झेंडेकरी, हंडेकरी, तुळशीधारी महिला व गळ्यामध्ये टाळ घेऊन चालणारे वारकरी या सोहळ्याचे मोठे आकर्षण ठरले. हा सोहळा सोमवारी सकाळी गडावरून खाली उतरून निमगाव मायंबा, आर्वी, पाडळी येथे मुक्कामी गेला आहे. सोहळ्यामध्ये नित्याचे कार्यक्रम होऊन सायंकाळी किर्तन सेवा ही पार पडणार असल्याचे सांगितले जाते. जनार्दन महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली चालू असलेला सोहळा व्यापक रूप घेताना दिसत आहे.



### करमेना म्हणून पंढरपूरला..

शेतात पावसाविना पिके वाऱ्यावरती फिरू लागली. त्यामुळे मनामध्येही उभे वारी सुटले. पाऊस नाही म्हणून मनाला मोठी उदासीनता निर्माण झाली आहे. मन रमत नाही हे मन रमण्यासाठी दिंडी सोहळ्यात चला पंढरीला असे म्हणत आहे हजारो भाविक भक्त या वर्षी नव्याने पावसाची वाट पाहून पंढरीकडे जाऊ लागले आहेत.


### नारायणगडच्या दिंडीचे आज पंढरीकडे प्रस्थान

श्री.क्षेत्र नारायण गडाची मठाधिपती महंत शिवाजी महाराज मार्गदर्शनाखाली व उत्तराधिकारी महंत संभाजी महाराज नेतृत्वाखाली पंचक्रोशीतील हजारो भाविकांना सोबतीला घेऊन श्री.क्षेत्र नारायण गडाचा पालखी पायी दिंडी सोहळा आज मंगळवार दि. १४ जुलै रोजी दुपारी ३ वाजता ज्ञानोबा तुकाराम असा जय घोष पंढरीकडे निघणार आहे. या पायी दिंडी सोहळ्याला मार्गस्थ करण्यासाठी श्री.क्षेत्र नारायण गडाचे सर्व विश्वस्त मंडळ, जिल्ह्याभरातून सामाजिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांसह मोठ्या संख्येने संत -महंत भाविक भक्त गडावरती उपस्थित राहणार आहे. प्रति वर्षाप्रमाणे हा सोहळा मोठ्या थाटामध्ये गडाचा डोंगर उतरून गडाच्या पायथ्याशी असलेल्या बेलुरा या गावी मुक्कामी जाणार आहे. प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी हजारोंच्या संख्येने भाविक भक्तांनी या सोहळ्यामध्ये सहभागी होऊन भक्तीचा आनंद लुटावा असे आवाहन महंत शिवाजी महाराज यांनी केले आहे.

## आ. धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त नाथ शिक्षण संस्थेत १५ ते २२ जुलैदरम्यान वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन सप्ताह-खाडे

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

नाथ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आणि परळीचे लोकप्रिय आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त नाथ शिक्षण संस्थेच्या वतीने दि. १५ ते २२ जुलै या कालावधीत वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन सप्ताह उत्साहात आयोजित करण्यात आला आहे. संस्थेच्या सचिव सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा पर्यावरणपूरक सप्ताह राबविण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे सहसचिव श्री प्रदीप खाडे यांनी दिली.



पर्यावरण संरक्षणाची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये दृढ व्हावी, निसर्गाशी त्यांचे भावनिक नाते निर्माण व्हावे आणि ''झाडे लावा, झाडे जगवा'' हा संदेश समाजात प्रभावीपणे पोहोचावा, या उद्देशाने सप्ताहादरम्यान विविध प्रजातींच्या रोपांचे वाटप, वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, पर्यावरण जनजागृती तसेच स्वच्छता व हरित परिसर अभियानासह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात नाथ शिक्षण संस्थेच्या सर्व शाळांतील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक सक्रिय सहभाग घेणार असून पर्यावरण संवर्धनाची सामाजिक जबाबदारी विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. या वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन सप्ताहात विद्यार्थी, पालक, नागरिक आणि पर्यावरणप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन हरित महाराष्ट्राच्या निर्मितीत आपले योगदान द्यावे, असे आवाहन नाथ शिक्षण संस्थेच्या वतीने सहसचिव श्री प्रदीप खाडे यांनी केले आहे.

## जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांतर्गत कंत्राटी नोकरीसाठी अर्ज सादर करावेत

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील माजी सैनिक, त्यांच्या वीरपत्नी आणि अवलंबितांसह सर्वसामान्य नागरिकांसाठी रोजगाराची उत्तम संधी चालून आली आहे. बीड जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या बीड आणि अंबाजोगाई येथील सैनिकी मुलांच्या वसतिगृहांमध्ये विविध पदावर तात्पुरत्या, रोजंदारी आणि कंत्राटी स्वरूपात भरती प्रक्रिया राबविली जात आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज दि.२० जुलै २०२६ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बीड येथे प्रत्यक्ष जमा करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

कंत्राटी भरतीमध्ये वसतिगृह अधीक्षक (१ पद), सहाय्यक वसतिगृह अधीक्षक (२ पदे), चौकीदार (२ पदे), महिला स्वयंपाकी (४ पदे), माळी कामगार (१ पद) आणि सफाई कामगार (२ पदे) अशा पदांचा समावेश आहे. या भरती प्रक्रियेत माजी सैनिकांना विशेष प्राधान्य दिले जाणार असले, तरी नागरी उमेदवारांनाही या पदांसाठी अर्ज करण्याची मुभा देण्यात आली आहे. या भरतीसाठी अर्ज करणारा उमेदवार निर्व्यसनी असणे अत्यंत आवश्यक आहे. यातील चौकीदार हे पद निवासी स्वरूपाचे असल्याने त्यांच्या कामाची वेळ २४ तासांची असेल, तर सहाय्यक वसतिगृह अधीक्षक पदासाठी संगणकाचे ज्ञान आणि टायपिंग अवगत असणे बंधनकारक करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज दि.२० जुलै २०२६ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बीड येथे प्रत्यक्ष जमा करायचे आहेत. अर्जासोबत सैन्य सेवेतील डिस्चार्ज बुक, माजी सैनिक ओळखपत्र आणि आधारकार्ड यांच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून पात्र उमेदवारांना मुलाखतीची तारीख नंतर कळवण्यात येईल. या सुवर्णसंधीचा जास्तीत जास्त माजी सैनिक व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले असून, अधिक माहितीसाठी इच्छुकांनी ०२४४२-२२२१०५ या संपर्क क्रमांकावर विचारणा करावी. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

पान ६ वरुन...

### आ. संदीप क्षीरसागर यांच्या

नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ९२ (१) अन्वये बीड शहरातील किल्ला मैदान पीटीआर मालमत्ता क्र. जुना १-९-१६२ व नवा १-९-१७८ येथील एकूण २२३०.२२ चौ.मी. जागेपैकी २००० चौ.मी. इतकी जागा अल्पसंख्याक मुलींच्या वसतिगृहासाठी महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्यास शासनाने रीतसर मान्यता दिली आहे. तसेच, बीड नगर परिषदेच्या मुख्यधिकाऱ्यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या समन्वयाने सदर जागा तातडीने हस्तांतरित करण्याची कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या ऐतिहासिक यशानंतर आमदार संदीप क्षीरसागर यांनी दिवंगत नेते अजितदादा पवार यांच्या स्मृतींना अत्यंत भावूक उजाळा दिला. तसेच, या प्रक्रियेला गती देऊन जागा मंजुरीची प्रक्रिया पूर्ण केल्याबद्दल राज्याच्या उपमुख्यमंत्री, अल्पसंख्याक विकास मंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार व शासनाचे विशेष आभार मानले आहेत. जागा हस्तांतरणाची प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होताच, अत्यंत आधुनिक आणि देखण्या वसतिगृहाच्या प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात केली जाईल, अशी ग्वाही आ. संदीप क्षीरसागर यांनी दिली असून, मुस्लिम व अल्पसंख्याक समाजाने याबद्दल आनंद व्यक्त करत आमदार क्षीरसागर यांच्या कार्यतत्परतेचे कौतुक केले आहे.

### मच्छिंद्रनाथ गडाचा

व्यवस्था तसेच इतर विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. आवश्यक त्या ठिकाणी तातडीने सुधारणा करण्याच्या सूचना देत विकासकामांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचा इशारा देण्यात आला.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनीही विविध कामांची बारकाईने पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश दिले. सर्व विभागांनी परस्पर समन्वय राखून कामांना गती देण्याबरोबरच दर्जा अबाधित ठेवण्यावर भर देण्याचे निर्देश त्यांनी दिले. नियोजनबद्ध आणि गुणवत्तापूर्ण विकासामुळे श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड भाविकांसाठी अधिक आकर्षक आणि सुविधा-संपन्न धार्मिक स्थळ म्हणून विकसित होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

पाहणीप्रसंगी उपविभागीय अधिकारी वसीमा शेख, तहसीलदार वैशाली पाटील, श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड ट्रस्टचे अध्यक्ष दादासाहेब चितळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ, उपअभियंता बादाडे, माऊली जरांगे, ट्रस्टचे उपाध्यक्ष, सचिव, विश्वस्त, विविध विभागांचे अधिकारी, पदाधिकारी, पत्रकार तसेच स्थानिक मान्यवर आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बीड नगरपरिषदेची

मंजूर ठरावांची आणि कामकाजाची सविस्तर माहिती प्रत्येक नगरसेवकापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. जोपर्यंत विकासकामांची संपूर्ण माहिती समोर येत नाही, तोपर्यंत आम्ही कोणत्याही गोष्टीला मान्यता देणार नाही. जर प्रत्येक गोष्ट स्वतःच्याच मनाने 'मंजूर झाली' असं दाखवून कारभार करायचा असेल, तर यापुढे प्रत्येक बैठकीमध्ये विरोधकांकडून हाच निर्णय घेतला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

पारदर्शक कामासाठी एकत्र - खुर्शीद आलम

नगरपालिकेमध्ये दर्जेदार आणि पारदर्शक कामे व्हावीत यासाठी आम्ही एकत्र आलो असून मागील बैठकांमध्ये मंजूर झालेल्या सर्व ठरावांची अधिकृत माहिती नगरसेवकांना लेखी स्वरूपात मिळावी. सध्या शहरात कोणती कामे चालू आहेत आणि कोणती कामे पुढे टेंडरसाठी पाठवली आहेत, याचा संपूर्ण तपशील द्यावा. प्रशासनाने स्वतःच्या मनाने किंवा हुकूमशाही पद्धतीने विषय मंजूर करणे थांबवावे. अन्यथा जर नगरपरिषद प्रशासनाने विकासकामांची संपूर्ण डिटेल्स आणि पारदर्शकता दिली नाही, तर आम्ही जिल्हाधिकारी आणि न्यायालयात जाऊ, असा इशारा रा. काँ. शरदचंद्र पवार पक्षाचे गटनेते खुर्शीद आलम यांनी दिला आहे.

### बीड येथे जनगणनेसाठी

गायकवाड, राजेश गवळी, मुकेश शिवगन, एकबालभाई शिकलकर, खुदुसभाई आतार, इब्राहिमभाई तांबोळी, बाबूभाई आतार, मौलाना इकबाल कुरेशी, लक्ष्मणसिंह ठाकूर, दिपक चौगुले, बाबूलाल ढोरमारे, किशोर शिंदे, गुलाब चव्हाण, कृष्णा संकोड, माऊली शिरसाट, रामेश्वर पवार, रामेश्वर सोनटक्के, प्रधान पवार, कैलास काटे, कैलास रंगदळ, रवी गंगावणे, दत्ता परदेशी, संतोष पाबळे, रामेश्वर कानडे, कृष्णा उपरे, अतुल कासार, परमेश्वर जाधव, बळीराम चोपणे, बळीराम यादव, चिंतामण सत्वधर, विश्वास आखाडे, सचिन दूधाळ, नामदेवराव दूधाळ, मोहनराव गोरे, संतराम पानखडे आदींसह विविध समाज संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सावता परिषदेचे प्रधान महासचिव डॉ. राजीव काळे, किशोर राऊत, विष्णू खेत्रे, प्रा. रणजीत आखाडे, सुनील शिंदे, अशोक हजारे, राजाभाऊ गवळी, शामराव शिंदे, महादेव कदम, दादासाहेब चौधरी, सुधीर चौधरे, बाबा वाघुले, सचिन दूधाळ ,बाळासाहेब रासवे, लक्ष्मीकांत शिंदे, दत्ता ढवळे, राधेश्याम लेंडाळ, हनुमान गायकवाड, बाबासाहेब शिंदे , बाबुराव राऊत आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## बीड येथे जिल्हास्तरीय स्पर्धेस १६ जुलैपासून सुरुवात

बीड । प्रतिनिधी

देशातील अत्यंत प्रतिष्ठित आणि सर्वात जुनी राष्ट्रीय शालेय फुटबॉल स्पर्धा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धेच्या जिल्हास्तरीय सामन्यांना दि.१६ जुलै २०२६ पासून बीडमध्ये सुरुवात होत आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील सन २०२६-२७ या वर्षातील शालेय क्रीडा स्पर्धांचा शानदार शुभारंभ होणार आहे, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी दिली आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड मार्फत जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथील मैदानावर दि. १६ आणि १७ जुलै २०२६ या कालावधीत ही जिल्हास्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. दि. १६ जुलै २०२६ रोजी १७ वर्षांखालील मुले आणि मुलींचे सामने, १७ जुलै २०२६ रोजी १५ वर्षांखालील मुलांचे सामने आयोजित करण्यात आले आहेत. १७ वर्षांखालील वयोगटासाठी खेळाडूचा जन्म १ जानेवारी २०१० रोजी किंवा त्यानंतर झालेला असावा. १५ वर्षांखालील वयोगटासाठी खेळाडूचा जन्म १ जानेवारी २०१२ रोजी किंवा त्यानंतर झालेला असावा. तसेच, १५ वर्षांखालील खेळाडूंना एआयएफएफ मान्यताप्राप्त वय निश्चितीबाबतची चाचणी करून घेणे बंधनकारक आहे. स्पर्धेचे प्रवेश अर्ज आणि प्रवेश शुल्क पावती दि. ११ जुलै २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत स्वीकारली जाईल. जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागी होण्यापूर्वी सर्व खेळाडू व संघांची .. या अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करणे अनिवार्य आहे. केवळ नोंदणीकृत आणि प्रवेश फी भरलेल्या संघांनाच स्पर्धेत प्रवेश दिला जाईल.

## नाथांच्या पालखीचे तांबाराजुरीत जंगी स्वागत

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील तांबाराजुरी येथे आषाढी एकादशीसाठी पैठण येथून निघणाऱ्या संत एकनाथ महाराजांच्या पालखीचे भव्यदिव्य स्वागत करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थांची उपस्थिती होती.



पंढरपूर वारीसाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातुन आषाढी एकादशीला भाविक भक्त पंढपुरात जमा होतात. जवळपास चारशे वर्षाची परंपरा असलेल्या पैठण येथील संत एकनाथ महाराजांचा असाच हा पालखी सोहळा. या पालखीस पंढपुरात देखील आळंदी व देहूच्या पालखी नंतर तृतीय क्रमांकाचा मान असतो. ही पालखी प्रतिवर्षी पंढरपुरी मार्गस्थ होताना तांबाराजुरी गावातून जाते. या गावात वर्षभरात कुठलीही यात्रा नसते. पालखी सोहळा हीच एक मोठी यात्रा असे येथील गावकरी मानतात. त्यामुळे समस्त गावकरी या दिवसाची प्रतिवर्षी आतुरतेने वाट पाहत असतात. त्यांच्यासाठी पालखी सोहळा म्हणजे आनंदाची मोठी पर्वणीच असते. अशा या पालखी सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी समस्त तांबाराजुरी तसेच परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने यावेळी जमले होते. गावाच्या वेशीवर या पालखीचे स्वागत मोठ्या जल्लोषात करण्यात आले. गावातील भजनी मंडळ विठूनामाचा गजर करत वेशीपर्यंत पालखीचे स्वागत करण्यास यावेळी पोहचले होते. ढोल ताशाचे पथक देखील स्वागतासाठी सज्ज होते. गावकऱ्यांच्या वतीने पालखीच्या प्रमुख महाराजांचे यावेळी यथोचित स्वागत करण्यात आले. जवळपास ३५ दिंड्या यावेळी पालखीत सहभागी होत्या. पालखीस पायघड्या टाकून पालखी गावात आणली गेली. काही काळ पालखी दर्शनासाठी गावात ठेवली गेली. यावेळी दर्शनासाठी लांबच लांब रांगा पाहायला मिळाल्या. पालखीत सहभागी असणाऱ्या वारकऱ्यांसाठी -जागोजागी फराळाची सोय करण्यात आली होती. सायंकाळी पालखी पाटोद्याकडे मार्गस्थ झाली. यावेळी महिलांनी अभंग, नाथांचे भारुडे तसेच फुगड्या खेळुन मोठ्या भक्तिभावाने पालखी पुढील पाटोदा मुक्कामी मार्गस्थ केली.

## नगर परिषदेकडून मालमत्ता नोंदींच्या प्रती देण्यास टाळाटाळ; नागरिकांची फरफट - राकेश साळवे

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव नगर परिषद प्रशासनाकडून नागरिकांना त्यांच्या मालमत्तेशी संबंधित आवश्यक कागदपत्रे वेळेत उपलब्ध करून देण्याऐवजी जाणीवपूर्वक टाळाटाळ केली जात असल्याचा गंभीर आरोप पीपल्स रिपब्लिकन पार्टीने केला आहे. मालमत्ता क्रमांक २९/५१५ संदर्भातील दि. १२ जून २०२६ पर्यंत झालेल्या सर्व नोंदी व आदेशांच्या प्रमाणित प्रती मिळण्यासाठी नियमानुसार अर्ज करूनही जवळपास महिनाभर उलटला तरी माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली नसल्याचा आरोप पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

याबाबत पक्षाचे तालुकाध्यक्ष राकेश साळवे आणि विधानसभा अध्यक्ष सिद्धार्थ ससाणे यांनी मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर



करून संबंधित मालमत्तेचे नामांतर आदेश, गहाणखत आदेश, हक्कसोड आदेश, वारसाहक्क आदेश, बक्षीसपत्र आदेश तसेच इतर सर्व नोंदींच्या प्रमाणित प्रती तात्काळ उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की संबंधित मालमत्तेप्रकरणी न्यायालयीन प्रक्रिया सुरू असल्याने या कागदपत्रांची अत्यंत तातडीने आवश्यकता आहे. मात्र अर्ज करूनही संबंधित अधिकारी व कर्मचारी माहिती देण्यास टाळाटाळ करत असून नागरिकांना वारंवार कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. त्यामुळे प्रशासनाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, मुख्याधिकारी लक्ष्मण धस व विघ्नेश मुंडे यांनी संबंधित कागदपत्रांसाठी माहितीचा अधिकार (आरटीआय) अंतर्गत अर्ज करण्याचा सल्ला दिल्याचे राकेश साळवे म्हटले आहे. नियमित प्रक्रियेत उपलब्ध करून देता येणाऱ्या कागदपत्रांसाठीही नागरिकांना आरटीआयचा आधार घ्यावा लागणे ही प्रशासनाच्या निष्क्रियतेची कबुली असल्याची टीका या वेळी राकेश साळवे यांनी केली.

नगर परिषदेकडे माहितीच्या अधिकाराखाली दाखल झालेले अनेक अर्ज आजही प्रलंबित असून त्यावर कोणतीही प्रभावी कार्यवाही होत नसल्याचा आरोपही पक्षाने केला आहे. संबंधित अधिकारी केवळ उडवाउडवीची उत्तरे देत असून माहिती देण्याची जबाबदारी टाळत असल्याचेही स्पष्ट झाले आहे.

नगर परिषद प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित मालमत्तेच्या सर्व प्रमाणित प्रती तातडीने उपलब्ध करून द्याव्यात. अन्यथा पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या वतीने कायदेशीर लढा उभारण्याबरोबरच लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा राकेश साळवे व सिद्धार्थ ससाणे यांनी दिला आहे.

## जातेगाव येथे एलसीबीचा छापा; ७.७५ लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील जातेगाव येथे स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत सुमारे ७ लाख ७५ हजार ५४० रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा जप्त केला आहे। याप्रकरणी अमोल महादेवराव धोंडरे (वय ३० वर्षे, रा. जातेगाव) याच्याविरुद्ध तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे



दिनांक १२ जुलै २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक गेवराई उपविभागाच्या हद्दीत अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासाठी गस्त घालत होते यादरम्यान, पथकाला गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, जातेगाव शिवारातील एका शेतातील गोठ्यात आणि ऊस पिकात प्रतिबंधित गुटखा साठवून ठेवण्यात आला आहे।

मिळालेल्या माहितीच्या आधारे, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या आदेशानुसार पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला। या छाप्यामध्ये अमोल धोंडरे याच्या ताब्यातून विविध कंपन्यांचा ७,७५,५४० रुपये किमतीचा गुटखा मिळून आला। याप्रकरणी तलवाडा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १२३, २७४, २७५ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके आणि पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली। कारवाईत पोउपनि शेखर औटे, अंकुश वरपे, गोविंद राख, बबन सलगर आणि नितीन वडमारे या पथकाचा समावेश होता.

cmyk

# जल, वृक्ष आणि अर्थसमृद्धीकडे सिरसाळाची दमदार वाटचाल!

## ग्लोबल विकास ट्रस्टच्या कार्यामुळे बीड जिल्हा जल, वृक्ष आणि अर्थसमृद्ध होईल - जिल्हाधिकारी

परळी वैजनाथ। प्रतिनिधी

जलसंधारण, वृक्षसंवर्धन आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीचा त्रिवेणी संगम घडविणाऱ्या 'जलवृक्ष समृद्धी अभियानाला' सिरसाळा येथे उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. ग्लोबल विकास ट्रस्ट () आणि जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नांतून बीड जिल्ह्याला जल, वृक्ष आणि अर्थसमृद्ध बनविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमात बोलताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी ग्लोबल विकास ट्रस्टच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, १०८ किलोमीटर नदी पुनरुज्जीवन आणि सिरसाळा येथील बुरुज व लेकुरवाळी या दोन तलावांचे खोलीकरण ही कामे मराठवाड्याच्या दुष्काळी भागासाठी आशेचा किरण आहेत. यामुळे भविष्यात पाण्याची टंचाई मोठ्या प्रमाणात कमी होईल. पाणी हेच जीवन असून, कमी पावसाच्या पार्श्वभूमीवर अशा उपक्रमांचे महत्त्व अधिक वाढते. लोकसहभागातून उभी राहिलेली ही चळवळ केवळ जलसंधारणापुरती मर्यादित नसून तंटामुक्ती, नशामुक्ती आणि सामाजिक एकोपा निर्माण करणारी परिवर्तनाची सुरुवात आहे. या कामांचे जतन करण्याची जबाबदारी नागरिकांनी स्वीकारावी, तसेच जिल्हा प्रशासन सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी जलनायक मयंक गांधी म्हणाले की, ''ग्लोबल विकास ट्रस्टला या भागासाठी अजून खूप काही करायचे आहे. गावकऱ्यांचा जितका अधिक सहभाग मिळेल, तितक्या वेगाने विकासाची गती वाढेल. पुढील दोन वर्षांत केवळ सिरसाळाच नव्हे, तर संपूर्ण परिसराचा चेहरामोहरा बदलण्याचा आमचा संकल्प आहे. जलसंचय, स्वच्छता, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ आणि मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करून हा परिसर जलवृक्ष समृद्ध बनविण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र यावे. एकोप्यातून समृद्धीची कास धरूया आणि राष्ट्राला सधन-संपन्न बनवूया.'' मराठवाड्यासारख्या दुष्काळग्रस्त आणि आत्महत्याग्रस्त भागात जलनायक मयंक गांधी यांच्या प्रेरणेतून सुरू असलेले हे कार्य अत्यंत प्रेरणादायी असल्याचेही जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले. जलसंधारण आणि शाश्वत शेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात अनेकपटीने वाढ होऊन आर्थिक समृद्धीचा नवा मार्ग खुला झाल्याचे त्यांनी सांगितले.




अनुसया मंगल कार्यालय येथे झालेल्या या कार्यक्रमास ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष जलनायक मयंक गांधी, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार विनोद रनवारे, गटविकास अधिकारी राजवर्धन भोसले, डॉ. हरिश्चंद्र वँगे, डॉ. सदाशिव देशपांडे, सरपंच शेख नशीब यांच्यासह अनेक मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांनी सरस्वती नदी पुनरुज्जीवन प्रकल्प तसेच पूर्णत्वास आलेल्या दोन्ही तलावांच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. प्रास्ताविकात सरपंच शेख नशीब यांनी सांगितले की, ''एक काळ असा होता की सिरसाळ्यात येणाऱ्या प्रत्येकाला पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागत होते. गेल्या पन्नास वर्षांपासून गावाने तीव्र दुष्काळ सहन केला. आम्ही जलनायक मयंक गांधी यांच्याकडे एका तलावाच्या खोलीकरणाची विनंती केली होती; मात्र ने दोन तलावांचे काम पूर्ण करून गावाच्या पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाय केला. आता गावात तीन लाख वृक्ष लागवड व संवर्धनाचा संकल्प करण्यात आला असून, आगामी काळात सिरसाळा 'जलवृक्ष समृद्ध गाव' म्हणून राज्यात आदर्श निर्माण करेल. उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर यांनीही सिरसाळ्यातील जलसंधारण, वृक्षलागवड आणि ग्लोबल विकास ट्रस्टच्या लोकसहभागातून राबविल्या जाणाऱ्या विकासकामांचे विशेष कौतुक केले.

**शाश्वत विकासाचे नवे पर्व!**

जलसंधारण, वृक्षसंवर्धन आणि आर्थिक उन्नती या त्रिसूत्रीच्या बळावर सिरसाळा आता शाश्वत विकासाच्या नव्या पर्वात प्रवेश करत असून, बीड जिल्ह्यासाठी हा उपक्रम आदर्श विकास मॉडेल ठरत असल्याची भावना संपूर्ण कार्यक्रमात व्यक्त करण्यात आली.

## शेळ्या-मेंढ्यांना होणाऱ्या फुट रॉट आजाराची लक्षणे व उपचार

फुट रॉट हा शेळ्यांमध्ये होणारा अत्यंत संसर्गजन्य आजार आहे. जो त्यांच्या खुरांवर परिणाम करतो. फुट रॉट या आजारामध्ये शेळ्या आणि मेंढ्यांचे पाय कुजतात. या आजारामध्ये जनावराचे वजन कमी होवुन उत्पादन कमी होते, आणि योग्य उपचार न मिळाल्यास जनावरांचा अकाली मृत्यू होतो. फुट रॉट हा शेळ्यांमध्ये होणारा अत्यंत संसर्गजन्य आजार आहे. जो त्यांच्या खुरांवर परिणाम करतो. फुट रॉट या आजारामध्ये शेळ्या आणि मेंढ्यांचे पाय कुजतात. या आजारामध्ये जनावराचे वजन कमी होवुन उत्पादन कमी होते, आणि योग्य उपचार न मिळाल्यास जनावरांचा अकाली मृत्यू होतो. या आजाराची लक्षणे : पाय कुजलेल्या शेळ्यांमध्ये वेदनेमुळे अस्वस्थता जाणवेल, प्रभावित खुर सुजतात आणि स्पर्शास कोमल लागतात. गंभीर प्रकरणांमध्ये सूज पाय वर वाढू शकते ज्यामुळे जनावरे लंगडत चालु लागतात. फूटरोटमुळे खुरांमधुन खराब वास येतो, ज्यामुळे प्रभावित खुरातील बॅक्टेरिया वाढीस लागतात. खुरांना तडे गेलेले किंवा खुर खराब झालेले दिसू शकतात आणि त्याचे पृष्ठभाग खडबडीत असू शकते. फूटरोटमुळे प्रभावित खुरातून स्त्राव होऊ शकतो, जे संसर्गाचे महत्वाचे लक्षण असू शकते. पाय कुजलेल्या शेळ्या उभे राहण्यास किंवा चालण्यास अनिच्छा दाखवत असतील, तर वेदना तीव्र असू शकतात. संसर्ग पसरण्यापासून आणि शेळ्यांमध्ये अधिक गंभीर आरोग्य समस्या निर्माण होण्यापासून रोखण्यासाठी शक्य तितक्या लवकर पाय कुजण्याचे निदान आणि उपचार करणे महत्वाचे आहे. या आजारावर नियंत्रण : पशुवैद्यांच्या सल्ला घेवुन वेळोवेळी जनावरांची नखे छाटावीत. कळपात समाविष्ट करण्यापुर्वी नव्या जनावरांना फूटरॉट आणि इतर जुनाट आजारा नसल्याची खात्री करुन घ्यावी. जनावरांच्या वाहतुक वाहनांचे निर्जंतुकीकरण करणे महत्वाचे आहे. फूटरॉट संसर्गचा धोका कमी होण्यासाठी दर ५ ते ७ दिवसांनी १० टक्के झिंक सल्फेटच्या पण्यामध्ये मेंढ्यांना १५ मिनिटांपर्यंत उभे राहण्यास भाग पाडावे. बाधित जनावरे बरी होईपर्यंत कोरड्या जागेत ठेवावीत, कारण ओलाव्यामुळे हा संसर्ग वाढतो.

## शेतकऱ्यांनो डीएपी खतास 'ही' पर्यायी खते वापरा!

खरीप हंगामात काही ठराविक खताची कमतरता नेहमी आढळते. राज्यामध्ये खरीप पेरणीला सुरुवात झाली असून शेतकरी वेगवेगळ्या खताची खरेदी करत आहे. विशेषतः डीएपी खताची शेतकऱ्यांकडून जास्त मागणी आहे. डीएपी खता मध्ये १८ टक्के नत्र तर ४६ टक्के स्फुरद ही अन्नद्रव्य आहेत.

डीएपी खताची कमतरता भरुन काढण्यासाठी पर्यायी खत वापरणे गरजेचे आहे. स्फुरदयुक्त खतामध्ये डीएपी खतानंतर एसएसपी या खताची सर्वाधिक मागणी आहे. एसएसपी खत हे देशातंर्गत तयार होत असून यामध्ये स्फुरद-१६ टक्के सह सल्फर व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये आढळून येतात. सल्फर अन्नद्रव्यामुळे तेलबिया पिकांमध्ये एसएसपी खताचा वापर फायदेशीर ठरणार आहे. डीएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व एसएसपी तीन गोणी खतांचा वापर डीएपी खतास चांगला पर्याय आहे. एसएसपी बरोबरच संयुक्त खते जसे की एनपीके - १०:२६:२६, एनपीके-२०:२०:०:१३, एनपीके-१२:३२:१६ व एनपीके-१५:१५:१५ या खतांच्या वापरामुळे नत्र व स्फुरद बरोबरच पालाश हे अन्नद्रव्य सुध्दा पिकांना उपलब्ध होते. त्यामुळे या संयुक्त खतांचा वापर केल्यास पिकांसाठी पोषक ठरतो. त्याच बरोबर टीएसपी या खता मध्ये ४६ टक्के स्फुरद अन्नद्रव्याची मात्रा असून डीएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व टीएसपी एक गोणी खतांचा वापर केल्यास तो देखील डीएपी खतास उत्तम पर्याय आहे. चालू खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांनी केवळ डीएपी खतावरच अवलंबून न राहता बाजार मध्ये उपलब्ध असलेल्या पर्यायी खतांचा वापर करण्याचे आवाहन कृषी विभागाकडून राज्यातील सर्व शेतकरी बांधवांना करण्यात येत आहे.



महाराष्ट्र राज्य हे मृद परिक्षण व जमीन आरोग्य पत्रिकांचे आधारे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन करण्यात इतर राज्यांच्या मानाने अग्रेसर आहे. जर शेतकर्यांनी उपलब्ध खताचे योग्य व्यवस्थापन केल्यास त्यांना खरीपात खत टंचाई सारख्या समस्येला सामोरा जावे लागणार नाही.

## खरीप पिकांचे आपत्कालीन व्यवस्थापन!

खरीप पिके, भाजीपाला आणि फळबागातील अतिरिक्त पाणी काढून टाकण्याची व्यवस्था करावी. काढणीस आलेल्या मूग आणि उडीद पिकाची लवकरात लवकर काढणी करावी व सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. भुईमुग पिकात रस शोषक किडींचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास फ्लूबेनडयामाइड ३.५% + हेक्साकोनाझोल ५% डब्ल्यूजी २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

भात पीक : भात खाचरात बांध बंधिस्ती करून पाण्याची पातळी ५ -१० सें. मी. पर्यंत नियंत्रित करावी. तपकिरी आणि हिरवे तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव दिसून येताच फिप्रोनील ५ एस.सी. २० मिली. प्रति १० लिटर पाण्यातून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. कापूस : पावसाची उघडीप बघून कापूस पिकात आंतरमशागतीची कामे करावीत. कापसाचे पीक ८० दिवसाचे झाल्यानंतर मुख्य फांदीचा शेंडा खुडावा यामुळे पिकात कायिक वाढ मर्यादित होते. हळद पीक : पिकामध्ये गरजेनुसार बेणणी करून करून नत्र खताची दुसरी मात्रा ८५० ग्रॅम युरिया प्रति गुंठा लागवडीनंतर तीन महिन्यांनी पावसाची तीव्रता कमी असताना द्यावी. कंदमाशीचा प्रादूर्भाव दिसून येत असल्यास व्यवस्थापनासाठी १५ दिवसांच्या अंतराने क्विनालफॉस २५% २० मिली किंवा डायमिथोएट ३० % १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून आलटून-पालटून पावसाची उघड बघून फवारणी करावी. जमिनीत वापसा असताना पिकात आंतरमशागतीची कामे करून पिक तण विरहीत ठेवावे. तूर : पीक ४५ दिवसाचे झाल्यानंतर शेंडे ५ सेंमी वरून खुडावेत. खोडमाशीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास ५% निंबोळी अर्क किंवा डायमेथोएट ३०% प्रवाही १५ मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. सोयाबीन पीकः



सोयाबीन पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. पांढऱ्या माशीचा प्रादूर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी एकरी १० ते १५ पिवळे चिकट सापळे लावावेत. पिवळा मोझॅक रोगाचा प्रादूर्भाव दिसून येत असल्यास प्रादूर्भाव ग्रस्त झाडे उपटून नष्ट करावीत. रोगाच्या व्यवस्थापनासाठी ॲसिटामिप्रिड २५% + बाइफेन्थ्रीन २५% डब्ल्यू जी १०० ग्रॅम किंवा बीटा साइफ्लुथ्रीन ८.४९% + इमिडाक्लोप्रीड १९.८१% ओडी १४० मिली किंवा थायमिथोक्झाम १२.६% + लॅम्बडा सिहॅलोथ्रीन ९.६% झेड सी ५० मिली प्रति एकर यापैकी एका किटकनाशकाची कोणत्याही प्रकारचे तणनाशक न मिसळता पावसाची उघड बघून फवारणी करावी. करपा रोगाच्या व्यवस्थापनासाठी टेब्युकोनॅझोल १०% + सल्फर ६५% १५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. किडींच्या व्यवस्थापनासाठी क्लोरँट्रानिलीप्रोल १८.५% ६० मिली प्रति एकर किंवा थायामिथोक्झाम १२.६% + लँबडा सायहॅलोथ्रिन ९.५% (पूर्वमिश्रित किटकनाशक) ५० मिली प्रति एकर किंवा क्लोरँट्रानिलीप्रोल ९.३% + लँबडा सायहॅलोथ्रिन ४.६% ८० मिली प्रति एकर (पूर्वमिश्रित किटकनाशक) किंवा टेट्रानिलीप्रोल १८.१८% १०० ते १२० मिली प्रति एकर किंवा बिटा सायफ्ल्युथ्रीन ८.४९% + इमिडाक्लोप्रीड १९.८१% (पूर्वमिश्रित किटकनाशक) १४० मिली प्रति एकर यापैकी कुठलेही एक किटकनाशक फवारावे.

खरीप ज्वारी : पिकात लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास व्यवस्थापनासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के ४ ग्रॅम किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून वरील किटकनाशकांची आलटून पालटून पावसाची उघड बघून फवारणी करावी. फवारणी करत असतांना किटकनाशक पोंग्यात पडेल अशाप्रकारे फवारणी करावी.

ऊस पीक : अतिरिक्त पाणी साचणे, कमी तापमान व वाढलेल्या आर्द्रतेमूळे पिकात पोक्का बोइंग रोगाचा प्रादूर्भाव दिसून येत आहे, व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझिम १२% + मॅन्कोझेब ६३% डब्ल्यूपी ५० ग्रॅम किंवा कॉपर ऑक्सीक्लोराइड ५०% डब्ल्यू पी २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून स्टीकरसह पावसाची उघड बघून १० ते १२ दिवसाच्या अंतराने २ ते ३ फवारण्या कराव्यात. पिकात हूमणीच्या अळ्या दिसून येत असल्यास मेटाराईझीयम ॲनोसोप्ली या जैविक बूरशीचा ४ किलो (जास्त प्रादुर्भाव असल्यास १० किलो) प्रति एकर जमिनीतून वापर करावा.

खोड किडीच्या व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस २०% २५ मिली किंवा क्लोरॅट्रानोलीप्रोल १८.५% ४ मिली प्रति १० लीटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. लिंबूवर्गीय पिके : मृग बहार संत्रा/मोसंबी बागेत किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी डायकोफॉल २५-३० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. बागेत फळगळ दिसून येत असल्यास एनएए १५ पीपीएम ची फवारणी करावी.

डाळिंब :

बागेतील अतिरिक्त फुटवे काढून टाकावेत. किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी डायकोफॉल २५-३० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. बागेत आंतरमशागतीची कामे करून तण नियंत्रण करावे. चिकू : बागेत जमिनीत वापसा असताना आंतरमशागतीची कामे करून तण नियंत्रण करावे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७८९ : पॅरिस मध्ये नागरिकांनी फ्रेंच राज्यसत्तेचे दडपशाहीचे चिन्ह असलेल्या बॅस्टिल तुरुंगावर हल्ला केला आतील सात बंद्यांची मुक्तता केली. ही घटना म्हणजे फ्रेंच क्रांतीची मुहूर्तमेढ होती.

१८५३ : न्युझीलंड मध्ये प्रथमच सार्वत्रिक निवडणुका झाल्या.

१८६७ : आल्फ्रेड नोबेल यांनी 'डायनामाईट' या स्फोटकाचे यशस्वी परीक्षण केले.

१९०१ : भारतीय स्वातंत्र्यसेनानी, राजकारणी आणि पत्रकार रती राम देशबंधू गुप्ता यांचा जन्मदिन.

१९०२ : उत्तरप्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री चंद्र भानू गुप्ता यांचा जन्मदिन.

१९२० : प्रसिद्ध भारतीय राजकारणी व महाराष्ट्र राज्याचे भूतपूर्व मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांचा जन्मदिन.

१९५८ : इराक मध्ये राजेशाही विरुद्ध उठाव. अब्दुल करीम कासम सत्तेवर.

१९६० : चिंपांझींचा अभ्यास करण्यासाठी जेन गुडॉल या टांझानियातील अभयारण्यात दाखल झाल्या. पुढील ४५ वर्षे त्यांनी चिंपांझींमधील कौटुंबिक व सामाजिक संबंध समजून घेण्यासाठी संशोधन केले.

१९६९ : अमेरिकेने ५००, १,०००, ५,००० व १०,००० च्या नोटा चलनातुन काढुन टाकल्या.

१९७६ : कॅनडात मृत्यूदंडाच्या शिक्षेवर बंदी घालण्यात आली.

२००३ : जागतिक बुद्धिबळ महासंघ द्वारा सन्दीप चंदा यांना ग्रँडमास्टर पुरस्कार मिळाला.

२०१३ : डाक व तार विभागाची १६० वर्षांपासुन सुरू असलेली तार सेवा बंद झाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : गोपाळ गणेश आगरकर लोकमान्य टिळकांचे सहकारी व 'केसरी'चे पहिले संपादक, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे एक संस्थापक व फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य, समाजसुधारक, विचारवंत व शिक्षणतज्ज्ञ, 'सुधारक' या वृत्तपत्राचे संस्थापक व संपादक (मृत्यू: १७ जून १८९५)

१८६२ : ऑस्ट्रियन चित्रकार गुस्टाफ क्लिम्ट यांचा जन्म.

१८८४ : यशवंत खुशाल देशपांडे महानुभाव वाङ्मयाचे नामवंत संशोधक, १९३९ मधे झुरिच येथे झालेल्या जागतिक इतिहास परिषदेतील भारताचे प्रतिनिधी (मृत्यू: २० नोव्हेंबर १९७०)

१८९३ : भारतीय कवी आणि लेखक गारिमेला सत्यनारायण यांचा जन्म. (मृत्यू: १८ डिसेंबर १९५२)

१९१० : टॉम अँड जेरीची चित्रे काढणारा चित्रकार विल्यम हॅना यांचा जन्म.

१९१७ : रोशनलाल नागरथ ऊर्फ 'रोशन' संगीतकार (मृत्यू: १६ नोव्हेंबर १९६७)

१९२० : शंकरराव चव्हाण केंद्रीय अर्थमंत्री, गृहमंत्री आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री (मृत्यू: २६ फेब्रुवारी २००४)

१९४७ : नवीन रामगुलाम मॉरिशसचे ३ रे व ६ वे पंतप्रधान

१९६७ : हशन तिलकरत्ने श्रीलंकेचा क्रिकेटपटू व राजकारणी

१९७१ : भारतातील अग्रगण्य अष्टपैलू खेळाडू ज्यांनी केवळ क्रिकेट आणि टेनिसमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले नाही तर फिल्ड हॉकी, सॉकर, टेबल टेनिस, बुद्धीबळ आणि पोलो खेळांमध्ये देखील पारंगत असणारे सय्यद मोहम्मद हाडी यांचे निधन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०४ : दक्षिण आफ्रिकेचे क्रांतिकारी पॉल क्रुगर यांचे निधन.

१९३६ : भारतीय वंशाचे लेखक आणि विद्वान धन गोपाळ मुखर्जी यांचे निधन. (जन्म: ६ जुलै १८९०)

१९६३ : स्वामी शिवानंद सरस्वती योगी व आध्यात्मिक गुरू (जन्म: ८ सप्टेंबर १८८७)

१९७५ : मदनमोहन संगीतकार (जन्म: २५ जून १९२४)

१९७९ : अमेरिकेने अणुचाचणी केली.

१९९३ : श्रीमंत विजयमाला राणीसाहेब करवीर संस्थानच्या महाराणी, खासदार (जन्म:)

१९९८ : मॅकडॉनल्ड चे सहसंस्थापक रिचर्ड मॅकडोनाल्ड यांचे निधन. (जन्म: १६ फेब्रुवारी १९०९)

२००३ : लीला चिटणीस हिंदी चित्रपट अभिनेत्री (जन्म: ९ सप्टेंबर १९०९)

२००३ : प्रो. राजेंद्र सिंग ऊर्फ 'रज्जू भैय्या' राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ४ थे सरसंघचालक (जन्म: २९ जानेवारी १९२२)

२००४ : स्वामी कल्याणदेव, पद्म भूषण पुरस्कार विजेते धर्मगुरू, विचारवंत , समाजसुधारक

२००८ : यशवंत विष्णू चंद्रचूड सर्वोच्च न्यायालयाचे १६ वे सरन्यायाधीश (जन्म: १२ जुलै १९२०)

## माती न करता केळीला खते टाकणे चुकिचेच

अनेक शेतकरी केळी लागवड करत आहेत. बाजारभाव चांगला, मागणी मोठी पण त्यासाठी लागणारी भांडवली गुंतवणूकही मोठीच. त्यातच सर्वाधिक खर्च होतो तो खते टाकण्यात. पण एक गोष्ट बऱ्याचदा दुर्लक्षित होते ती म्हणजे माती परीक्षण. ''अंधारात दिवा न घेता चालणं म्हणजे धोका तसंच माती न तपासता खते घालणं म्हणजे पार चुकिचे आहे.

केळीला खरेच अधिक खते लागतात का?: केळी ही अन्नद्रव्यांची मोठ्या प्रमाणात मागणी करणारी पिकं आहे. पण अधिक म्हणजे काय? किती? कोणती खते? केव्हा? हे सर्व तुमच्या मातीच्या स्थितीवर अवलंबून आहे. जर मातीमध्ये आधीपासूनच नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅश, किंवा काही सूक्ष्म अन्नद्रव्यं पुरेशा प्रमाणात असतील, तर ते पुन्हा घालणं म्हणजे उगाच खर्च आहे.माती परीक्षणामुळे काय कळतं? : मातीतील (सामू), (विद्युत वाहकता) नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅश यांचं प्रमाण. सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता. सेंद्रिय कर्बाचे प्रमाण. मातीची पोत आणि क्षारता.अंधपणे खते टाकल्याचे परिणाम : खर्चात अनावश्यक वाढ, मातीचा पोत बिघडतो, झाडांची वाढ मंदावते, उत्पादन घटते, शेवटी शेतकऱ्याच्या नफ्यावर परिणाम.माती परीक्षणाचे फायदे : खतांचा अचूक डोस, उत्पादनात वाढ, माती आरोग्य टिकवणं, खर्चावर नियंत्रण, दीर्घकाळ टिकणारी शाश्वत शेती.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
मंगळवार दि.१४ जुलै २०२६ ५



# ब्रिटिशकालीन दुय्यम कारागृह बंद!

## न्यायव्यवस्थेची तारीख पे तारीख? : कैद्यांच्या मानवाधिकार व व्यक्तीस्वातंत्र्याचे काय ?

प्रा.दादासाहेब खेडकर

पाथर्डी : महाराष्ट्र शासनाच्या आदेशान्वये पाथर्डी तालुक्यातील महसूल व मॅजेस्ट्रेट यांच्या अधिपत्याखालील दुय्यम कारागृह बंद करण्याचे आदेश दिल्याने सर्व कुख्यात व किरकोळ गुन्हेगारांची रवानगी थेट नाशिक सेंट्रल जेल कारागृहात करण्यात आली यामध्ये पाथर्डी तालुक्यातील दुय्यम कारागृहातील ४२ आरोपींचा समावेश होता तुरुंगाधीक्षक व तहसीलदार डॉ.उद्धव नाईक व पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व आरोपींची वैद्यकीय तपासणी कागदपत्रे व सुरक्षाविषयक प्रक्रिया पूर्ण करून त्यांना नाशिक येथील सेंट्रल जेल येथे नेण्यात आले ब्रिटिशकालीन पाथर्डी पोलीस स्टेशन जुनी इमारत १९१७ ला निर्माण करण्यात आली होती या इमारतीस तहसीलदार महाल असे संबोधले जायचे या




इमारतीतून पोलीस महसूल खरेदी विक्री व दुय्यम कारागृह असा कारभार चालत असे यामुळे १०९ वर्षांचा तहसीलदार महाल इमारत इतिहास जमा होणार आहे पाथर्डी पोलीस ठाणे अंतर्गत दुय्यम कारागृहातून तब्बल ४२ आरोपींची नाशिक सेंट्रल जेल येथे रवानगी करण्यात येणार असल्याचे समजताच नातेवाईकांनी दुय्यम कारागृहात मोठी गर्दी केली होती.

कैद्यांना भेटण्यासाठी आलेल्या कैद्यांच्या पत्नी लहान जन्मजात शिशु बाळ आई वडील आजी आजोबा व इतर नातेवाईक यांनी भावनिक निरोप देताना त्यांचे डोळे पाणवले होते गुन्हेगारी टोळी अतिरेकी बलात्कारी दरोडेखोर यांपासून स्वसंरक्षणार्थ गुन्हा करताना कधी तरी चोर सोडून सन्यासाला फाशी मिळते फौजदारी हिंसाचार व कौटुंबिक खटले यामुळे गुन्हेगारी बळवते अवैध धंद्यांना प्रोत्साहन देणारी व्यवस्था वाढत चालल्याने सुशिक्षित युवक पिढी गुन्हेगारीकडे का वाढत आहे यावर समुपदेशन पोलीस केंद्र उभारले जात नाहीत याउलट खोटे गुन्हे दाखल करून गुन्हेगारी क्षेत्र फोफावत आहे.

तालुक्यातील डीएम कारागृह बंद केल्याने गुन्हेगारी व्यवस्था कायदा व सुव्यवस्था स्थानिक प्रशासनावर थेट परिणाम होणार आहे जिल्हा बाहेरील इतर तुरुंगावर ताण आणि गर्दी निर्माण होऊ शकते यामुळे त्या तुरुंगामधील क्षमतेपेक्षा जास्त भार वाढून कैद्यांच्या राहणीमानात व सुरक्षेमध्ये समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे कैद्यांना न्यायालयाच्या तारखांना ने आण करण्यासाठी पोलिसांना लांबचा प्रवास करावा लागेल अतिरिक्त प्रवास व वाहतूक व्यवस्थेमुळे खटल्यांच्या सुनावणी वेळेवर होऊ शकत नाहीत प्रशासकीय आर्थिक भार वाढवू शकतो पोलिसांचा वेळ आणि खर्च कैद्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने प्रवास जास्त होईल कैद्यांच्या स्थलांतरणासाठी अतिरिक्त सुरक्षा व पोलीस बंदोबस्त तैनात करावा लागेल कैद्यांच्या मानवाधिकार आणि पुनर्वसनावर तुरुंग लांब गेल्यामुळे कुटुंबीयांना कैद्यांना भेटणे कठीण जाईल कैद्यांचा कुटुंबाशी संपर्क तुटल्यास त्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर परिणाम होऊ शकतो कैद्यांच्या वर्षानुवर्षे न्यायालयाच्या हेलपाटे चक्रा व तारीख पे तारीख जैसे थे राहिल्याने गुन्हेगारीचे विकेंद्रीकरण जास्त होण्याची शक्यता आहे कैद्यांचे कौशल्य विकासाचे व शिक्षणाचे उपक्रमही निष्क्रिय होण्याची शक्यता असल्याने गुन्हेगारी जास्त बळावेल परंतु गुन्हेगारीला आळा बसण्याची शक्यता फार कमी असल्याने व तालुक्यातील दुय्यम कारागृहे बंद केल्याने आणि जिल्ह्याबाहेरील अल्प कारागृहाच्या क्षमतेपेक्षा जास्त कैद्यांना डांबून ठेवल्यास कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची शाश्वती सरकार घेणार आहे काय या सर्व बाबींचा विचार करत शासनाने तालुक्यातील दुय्यम कारागृह बंद करण्याच्या आदेशावर फेरविचार करण्याची गरज आहे.

# पोलिसात दाखल तक्रारीची बातमी देणे बदनामी नव्हे

## उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

जालना । प्रतिनिधी

पोलिसांकडे दाखल झालेल्या प्रथम माहिती अहवालातील (एफआयआर) मजकुराच्या आधारे सत्य माहिती प्रकाशित करणे, हे भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ५०० अंतर्गत फौजदारीपात्र बदनामी ठरत नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाने दिला आहे. कायदेशीर अधिकाऱ्यांकडे केलेल्या तक्रारींना कायद्याने संरक्षण प्राप्त असून, अशा तक्रारींचे उचित वार्तांकन करणे हे भारतीय संविधानाच्या कलम १९(१)(अ) अन्वये सुनिश्चित केलेल्या भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचाच एक भाग आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायमूर्ती राकेश कैंथला यांनी 'सुरिंदर शर्मा विरुद्ध परवीन कालिया व अन्य' या प्रकरणात हा निकाल दिला.

या निकालाचे स्वागत करताना जालना येथील नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष, ॲड. महेश धन्नावत यांनी आपली प्रतिक्रिया दिली. ॲड. धन्नावत म्हणाले, ''हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचा हा निर्णय पत्रकारितेच्या स्वातंत्र्याचे रक्षण करणारा आणि लोकशाही मूल्यांना बळकटी देणारा आहे. पोलिसात दाखल झालेली तक्रार ही एक सार्वजनिक दस्तऐवज बनते आणि त्यातील माहिती लोकांपर्यंत पोहोचवणे हे पत्रकारांचे कर्तव्य आहे. जोपर्यंत बातमीमध्ये असत्य किंवा हेतुपुरस्सर बदनामीकारक मजकूर समाविष्ट केलेला नाही, तोपर्यंत केवळ एफआयआरमधील माहिती प्रकाशित केल्याबद्दल पत्रकारांवर फौजदारी कारवाई करणे अयोग्य आहे. हा निकाल देशभरातील पत्रकारांसाठी आणि नागरिकांसाठी एक मोठे कायदेशीर संरक्षण आहे.''

प्रकरणाची पार्श्वभूमी अशी की, माता चिंतपूर्णी मंदिरात पुजारी असलेल्या तक्रारदारांनी पत्रकार सुरिंदर शर्मा आणि व्यावसायिक राजेश कालिया यांच्यावर फौजदारी बदनामीचा खटला दाखल केला होता. तक्रारदारांच्या दुकानासमोर दुकान असलेल्या राजेश कालिया यांनी व्यावसायिक वैमनस्यातून नोव्हेंबर आणि डिसेंबर २०२१ मध्ये त्यांच्याविरुद्ध पोलिसात खोट्या तक्रारी दाखल केल्या होत्या आणि पत्रकार सुरिंदर शर्मा यांनी 'उना केसरी' या वृत्तपत्रात त्या तक्रारींवर आधारित वृत्त प्रकाशित केले होते, असा आरोप तक्रारदारांनी केला होता. या बातमीमुळे समाजात आपली प्रतिष्ठा कमी झाली आणि नातेवाईक व ओळखीच्या लोकांकडून विचारणा झाल्याने मानसिक त्रास झाला, असे तक्रारदारांचे म्हणणे होते. या तक्रारीच्या आधारे, ट्रायल कोर्टाने आरोपींना भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ५०० (बदनामी) आणि १२०-ब (फौजदारी कट) अंतर्गत समन्स बजावले होते. या समन्स आदेशाला आणि तक्रारीला रद्द करण्यासाठी आरोपींनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. उच्च न्यायालयाने आपल्या निकालात स्पष्ट केले की, कायदेशीर प्राधिकरणासमोर केलेली तक्रार ही भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ४९९ च्या अपवादांमध्ये संरक्षित आहे आणि केवळ तक्रार करणे हे बदनामी ठरत नाही. जरी तक्रारीतील आरोपांवर नंतर विवाद झाला तरी, कायदेशीर मार्गाने तक्रार दाखल करणे आपोआप बदनामी होत नाही. जनतेला व्यापक आणि अचूक माहिती पुरवणे हे माध्यमांचे प्राथमिक कार्य आहे, विशेषतः जेव्हा एखादी बाब सार्वजनिक पटलावर येते. त्यामुळे, सार्वजनिक पटलावरील घडामोडींचे सत्य वृत्त देणे हा भाषण स्वातंत्र्यातून मिळणारा अधिकार आहे, असे न्यायालयाने नमूद केले.

# हरिनामाचा गजर करत भगवानगड पालखीचे पंढरपूरकडे झाले प्रस्थान

## दिंडीच्या सोहळ्यात व वारकऱ्यांच्या मेळात भगवानबाबा याची देही याची डोळा पाहिला !

पाथर्डी प्रतिनिधी

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले श्री क्षेत्र भगवानगड राष्ट्रसंत भगवानबाबा भगवानगडकर यांच्या पालखीचे प्रस्थान महंत डॉ.नामदेव शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आमदार मोनिका राजळे ज्येष्ठ नेते एड.प्रताप ढाकणे जय भगवान महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब सानप व अन्य भगवान भक्तांच्या उपस्थितीत सोमवारी सायंकाळी पाच वाजता भगवानगडावरून पंढरपूरकडे मार्गस्थ झाली भगवानगडाच्या दिंडीचा पहिला मुक्काम सोमवारी भारजवाडी गावात झाल्यानंतर मंगळवारी सकाळी जवळपास ४० ते ५० हजार वारकऱ्यांसमवेत भगवानगडाचे महंत न्यायाचार्य डॉ.नामदेव महाराज शास्त्री भगवानगडाचे चतुर्थ उत्तराधिकारी ह.भ.प.कृष्णा महाराज शास्त्री,भगवानगडाचे आचार्य नारायण स्वामीजी तसेच भगवानगडावरील सर्व वारकरी भक्तांच्या उपस्थितीत हरिनामाचा गजर करत दिंडीची भव्य शोभायात्रा व मिरवणूक भारजवाडी ते खरवंडी कासार,किर्तनवाडी, मालेवाडी गावापर्यंत काढण्यात येणार या मिरवणूक आणि शोभायात्रेमध्ये भगवान विद्यालय माध्यमिक विद्यालय मालेवाडी शाळेतील विद्यार्थी सहभाग नोंदवतील विद्यार्थी वारकऱ्यांची तसेच राष्ट्रसंत भगवानबाबा यांची वेशभूषा साकारत लेझीम झांज पथक हाती घेत विठ्ठल नामाची शाळा भरली,पाऊले चालती पंढरीची वाट,दिव्य सोहळा पाहुणे डोळा देह माऊली माऊली झाला,विठ्ठल विठ्ठल विठ्ठला पांडुरंग विठ्ठला इत्यादी भगवान परमात्मा पांडुरंगाच्या भावगीतांवर ठेका धरून दिंडीचे पावित्र्य व संस्कृती दाखवतील भगवानबाबांच्या दिंडीमध्ये प्रामुख्याने महिला वारकऱ्यांनी डोक्यावर तुळशी वृंदावन घेतले होते हरिनामाच्या जयघोषात भगवानबाबांची दिंडी एकूण दहा मुक्काम करत अकराव्या मुक्कामी पांडुरंगाच्या भेटीसाठी पंढरपूरला दाखल होणार आहे.



# 'लाडकी बहीण योजनेतून फक्त अपात्रांची नावे वगळली'

## ९२ लाख लाभार्थी कमी झाल्याच्या चर्चेवर संजय शिरसाटांचे स्पष्टीकरण

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

राज्यातील 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतून ९२ लाख लाभार्थ्यांची नावे वगळण्यात आल्याच्या चर्चेदरम्यान शिवसेना नेते तथा मंत्री संजय शिरसाट यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. ही योजना बंद होणार नसून केवळ अपात्र लाभार्थ्यांची नावे यादीतून कमी केली जात आहेत, असे त्यांनी ठामपणे सांगितले. त्याचबरोबर वारकरी अपघात, मराठवाड्यातील संभाव्य दुष्काळ, शेतकरी कर्जमाफी आणि उद्धव ठाकरे यांच्या पत्रकार परिषदेसह विविध विषयांवरही त्यांनी भाष्य केले.

लाडकी बहीण योजनेतून मोठ्या प्रमाणावर नावे कमी केल्याबाबत बोलताना शिरसाट म्हणाले की, ही योजना सुरू करतानाच राज्याच्या तिजोरीवर आर्थिक ताण येणार असल्याची सरकारला पूर्ण कल्पना होती. तरीही सर्वसामान्य महिलांना आर्थिक आधार मिळावा, त्यांचा संसार उभा राहावा आणि त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला. ते म्हणाले, ''काही जण प्राप्तिकर भरतात, काहींकडे चारचाकी वाहने आहेत, काही नोकरीत आहेत, तर काही पुरुषांनीही महिला म्हणून अर्ज करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे जे या योजनेच्या निकषात बसत नाहीत, त्यांचीच नावे वगळली जात आहेत. पात्र महिलांना वगळण्याचा प्रश्नच नाही.'' शिरसाट यांनी पुढे स्पष्ट केले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही ही योजना कोणत्याही परिस्थितीत बंद होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे लाभार्थी महिलांनी कोणतीही चिंता करण्याचे कारण नाही.

# कयाधू नदीपात्रात बैलजोडी धुण्यासाठी गेलेल्या दोन युवकांचा पाण्यात बुडून करुण अंत


हिंगोली। प्रतिनिधी

हिंगोली तालुक्यातील घोटा शिवारात कयाधू नदीच्या पात्रात बैलजोडी धुण्यासाठी गेलेल्या दोन युवकांचा पाण्यात बुडून करुण अंत झाल्याची घटना रविवारी ता. १२ रात्री उघडकीस आली आहे. दोघांवर शोकाकुल वातावरणात घोटा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. या घटनेमुळे घोटा गावावर शोककळा पसरली आहे. या घटनेची नर्सी नामदेव पोलिस ठाण्यात नोंद झाली नाही.

याबाबत गावकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, घोटा येथील कृष्णा बालाजी अटक (१६) व त्याचा मित्र गणेश उर्फ बंटी अर्जुन पावडे (१६) हे दोघे रविवारी ता. १२ दुपारी बैलजोडी धुण्यासाठी तसेच शेळ्या चारण्यासाठी कयाधू नदीच्या परिसरात गेले होते. दुपारच्या सुमारे कयाधू नदीच्या पात्रात खोल खड्डा असलेल्या भागातील पाण्यात दोघेही उतरले. यावेळी दोघांनाही पाण्याचा अंदाज आला नाही. त्यामुळे दोघेही पाण्यात बुडाले. मात्र पाण्यावर येण्याच्या प्रयत्नात ते खड्ड्यातील गाळात अधिकच फसल्या गेले. त्यातच त्यांचा मृत्यू झाला.दरम्यान, सायंकाळी शेळ्या घरी आल्या अन दोघेही घरी आले नसल्याने त्यांच्या कुटूंबियांनी त्यांचा शोध सुरु केला. यावेळी गावकऱ्यांनी कयाधू नदीच्या पात्रातील खड्ड्यात पाहणी केली असता दोघांचे मृतदेह गाळात फसल्याच्या स्थितीत आढळून आले. गावकऱ्यांनी दोघांचेही मृतदेह बाहेर काढल्यानंतर त्यांच्या कुटूंबियांनी हंबरडाच फोडले. यामुळे परिसरातील वातावरण धिरगंभीर झाले होते. दरम्यान, घटनास्थळी पोलिस पोहोचण्यापुर्वीच त्यांच्या कुटूंबियांनी दोघांचेही मृतदेह घरी नेले होते. त्यानंतर रात्री उशीरा शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेमुळे गावावर शोककळा पसरली आहे. मयत कृष्णा हा नुकताच दहावी पास झाला होता. त्याने हिंगोली तालुक्यातील एका महाविद्यालयात प्रवेश घेतला होता. त्याच्या पश्चात आई, वडील, एक भाऊ असा परिवार आहे. तसेच मयत बंटी उर्फ गणेश याच्या पश्चात आई, वडील दोन भाऊ असा परिवार असल्याचे सांगण्यात आले आहे. बंटी हा देखील नुकताच दहावी पास झाला होता. या घटनेची नर्सी नामदेव पोलिस ठाण्यात नोंद झाली नाही.

# देशातील सर्वोच्च नागरी सन्मानासाठी ३१ जुलैपर्यंत नामांकनाची संधी

केंद्र शासनाने जारी केलेल्या निकषानुसार पद्मभूषण पुरस्कारसाठी मान्यवरांची शिफारस पद्मश्री पुरस्कार प्राप्त केल्यानंतर पाच वर्षांनी, तर पद्मविभूषण पुरस्कारासाठी मान्यवरांची शिफारस पद्मभूषण पुरस्कार प्राप्त केल्यानंतर पाच वर्षांनी करता येईल. मात्र, अपवादात्मक प्रकरणांमध्ये ही अट शिथिल करण्याचा विचार केला जाऊ शकतो. तसेच शासकीय सेवेतील तसेच सार्वजनिक उपक्रमांतील डॉक्टर व वैज्ञानिक वगळता अन्य कर्मचारी व अधिकारी पद्म पुरस्कारासाठी पात्र राहणार नाहीत असेही शासनाने स्पष्ट केले आहे. लिंग, वंश, व्यवसाय किंवा पदाचा कोणताही भेदभाव न करता कोणतीही व्यक्ती या पुरस्कारासाठी पात्र आहे. तथापि डॉक्टर आणि शास्त्रज्ञ वगळता, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमध्ये काम करणाऱ्यांसह कार्यरत सरकारी कर्मचारी या पुरस्कारांसाठी पात्र नाहीत. हा पुरस्कार उल्लेखनीय कार्याची दखल घेण्यासाठी दिला जातो आणि विविध क्षेत्रांमध्ये, शाखांमधील विशिष्ट व असाधारण कामगिरी किंवा सेवेसाठी प्रदान केला जातो. पद्म पुरस्कार, पद्मविभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री या तीन श्रेणीमध्ये दिला जातो या तिन्ही पदकांची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत. पद्मविभूषण हे देशातील दुसरे सर्वोच्च सन्मान पदक आहे.हे कास्य धातूचे बनलेले असून,त्यावर पद्म आणि विभूषण हे शब्द




देवनागरी लिपीत कोरलेले असतात. पद्मभूषण हे देशातील तिसरे सर्वोच्च पदक आहे. हे पांढऱ्या कांश्य धातूचे बनलेले असते. पद्मश्री हे चौथे सर्वोच्च नागरी सन्मान पदक आहे. हे पांढऱ्या कास्यं धातूचे बनलेले असते. पदकाची रचना मध्यभागी कमळाचे फुल कोरलेले असते. कमळाच्या फुलावर पद्म वरच्या बाजूला आणि श्री खालच्या बाजूला हे शब्द देवनागरी लिपीत लिहिलेले असतात. या क्षेत्रांची प्रातिनिधीक यादी पुढीलप्रमाणे आहे. कला- यात संगीत, चित्रकला, शिल्पकला, छायाचित्रण, चित्रपट, नाट्य इत्यादींचा समावेश होतो. समाजसेवा- यात परवडणारी आरोग्यसेवा आणि शिक्षण या क्षेत्रांतील सामाजिक व सेवाभावी कार्य, तसेच पर्यावरण, स्वच्छता इत्यादींसारख्या सामुदायिक प्रकल्पांमधील इतर योगदानाचा समावेश होतो. सार्वजनिक व्यवहार- यात कायदा, सार्वजनिक जीवन,राजकारण इत्यादी क्षेत्रांतील कार्याचा समावेश होतो. विज्ञान आणि अभियांत्रिकी - यात अंतराळ अभियांत्रिकी,अणुविज्ञान, माहिती तंत्रज्ञान,विज्ञान व संबंधित विषयांवरील संशोधन आणि विकास इत्यादींचा समावेश होतो. व्यापार आणि उद्योग - यात बँकिंग,आर्थिक घडामोडी,व्यवस्थापन, तसेच उत्पादन आदरातिथ्य (हॉस्पिटलिटी ), तंत्रज्ञान, वस्त्रोद्योग, लेखांकन, वित्त, पर्यटन इत्यादी क्षेत्रांतील व्यापार व व्यवसायाचा समावेश होतो. वैद्यकशास्त्र - यामध्ये ॲलोपॅथी, आयुर्वेदिक, होमिओपॅथि, सिद्ध, निसर्गोपचार इत्यादींमधील वैद्यकीय संशोधन आणि विशेष प्राविण्य, विशेषज्ञता यांचा समावेश आहे. साहित्य आणि शिक्षण- यामध्ये साक्षरता आणि शिक्षणाचा प्रचार, शैक्षणिक सुधारणा, अध्यापन, पत्रकारिता, साहित्य आणि कविता, लेखन इत्यादींचा समावेश आहे. नागरी सेवा - यामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांनी प्रशासन

**डॉ. संजय तांदळे**
शिक्षण व करिअर कौन्सिलर, बीड.

इत्यादी क्षेत्रात मिळवलेले विशेष प्राविण्य,उत्कृष्टता यांचा समावेश आहे. क्रीडा - यामध्ये खेळ,ॲथलेटिक्स,गिर्यारोहण खेळांना प्रोत्साहन इत्यादींचा समावेश आहे. इतर - यामध्ये वर नमूद केलेल्या क्षेत्रांमध्ये समावेश नसलेल्या क्षेत्रांचा समावेश आहे.यामध्ये यामध्ये अध्यात्म, योग, वन्यजीव संरक्षण, संवर्धन, पाककला, कृषी, तळागाळातील नवोउपक्रम, पुरातत्त्वशास्त्र, वास्तुकला इत्यादींचा समावेश असू शकतो. मरणोत्तर प्रकरणे - हा पुरस्कार मरणोत्तर प्रदान केला जात नाही. तथापि, अत्यंत पात्र आणि दुर्मिळ प्रकरणांमध्ये, सरकार मरणोत्तर पुरस्कार देण्याचा विचार करू शकते. पद्म पुरस्काराच्या उच्च श्रेणीसाठी पात्रता - एखाद्या व्यक्तीला उच्च श्रेणीचा पद्म पुरस्कार तेव्हाच प्रदान केला जाऊ शकतो, जेव्हा पूर्वीचा पद्म पुरस्कार प्रदान झाल्यापासून किमान पाच वर्षाचा कालावधी उलटला असेल. तथापि, दुर्मिळ आणि अत्यंत अपवादात्मक कामगिरीच्या बाबतीत पुरस्कार समितीकडून अपवाद केला जाऊ शकतो.

अलंकार - सनद( प्रमाणपत्र )आणि पदक, मुख्य पदकाची एक लहान प्रतिकृती( लघु प्रतिकृती ) प्राप्तकर्त्याला स्वातंत्रपणे दिली जाते, जी तो/ ती शासकीय/ औपचारिक कार्यक्रमांदरम्यान इत्यादी ठिकाणी परिधान करू शकतो /शकते, या पुरस्कारांसोबत कोणतेही आर्थिक अनुदान जोडलेले नाही, हा पुरस्कार कोणतीही पदवी मानली जात नाही. आणि कोणत्याही प्रकारे प्राप्तकर्त्याच्या नावापुढे प्रत्यय किंवा उपसर्ग म्हणून वापरला जाऊ नये.पुरस्कार मिळवणाऱ्यांची संख्या - एका वर्षात (म्हणून तर प्रकरणे आणि परदेशी /अनिवासी भारतीय /परदेशी नागरिक वगळून )एकूण १२० पुरस्कार दिले जाऊ शकतात. पद्म पुरस्कारांसाठी प्राप्त झालेली सर्व नामांकने /शिफारसी पद्म पुरस्कार समितीसमोर ठेवली जातात,जी दरवर्षी पंतप्रधानाद्वारे गठीत केली जाते. पुरस्कार समितीच्या शिफारशी शिवाय कोणताही पुरस्कार प्रदान केला जात नाही. समितीच्या शिफारशी मंजुरीसाठी पंतप्रधान आणि भारताचे राष्ट्रपती यांच्याकडे सादर केल्या जातात. दरवर्षी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला नावांची घोषणा केली जाते. हे पुरस्कार भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्ते साधारणपणे दरवर्षी मार्च / एप्रिल महिन्यात प्रदान केले जातात, जेथे पुरस्कार विजेत्यांना राष्ट्रपतींची स्वाक्षरी असलेली सनद ( प्रमाणपत्र )आणि एक पदक दिले जाते. पुरस्कार पदान समारंभाच्या दिवशी पुरस्कार विजेत्यांची नावे 'गॅझेट ऑफ इंडिया' मध्ये प्रकाशित केली जातात. कोण करू शकतात नामांकन - नामांकन प्रक्रिया जनतेसाठी खुली आहे. स्व - नामांकन देखील केले जाऊ शकते. वरील निकषांच्या आधारे शिफारस योग्य प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय, विभागीय आयुक्त कार्यालय व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या स्तरावर //padmaawards.gov.in

या राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने ३१ जुलै २०२६ पर्यंत सादर करावेत त्यानंतर या पोर्टलवर कोणतेही नामांकन अथवा शिफारस स्वीकारली जाणार नाही. तरी पद्म पुरस्कारासाठी इच्छुक पात्र व्यक्तींनी दिनांक ३१ जुलै २०२६ पर्यंत प्रस्ताव, नामांकन राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर भेट देऊन सादर करावेत असे आवाहन केंद्र शासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# ४८ लाखांच्या पुलाच्या कामात सिमेंट खडीऐवजी मातीचा भर

## कंत्राटदाराचा निष्काळजीपणा चव्हाट्यावर; बनकरांजा ग्रामस्थ संतप्त

केज । प्रतिनिधी

राज्यामध्ये विकासाच्या कामांत अग्रेसर असलेल्या केज तालुक्यातील बनकरंजा गावात सध्या सुरू असलेल्या विकासकामांच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गावात ४८ लाख रुपये खर्चून पुलाचे बांधकाम केले जात आहे, परंतु या कामात कंत्राटदाराकडून अत्यंत निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असल्याचे समोर आले आहे.







बनकरंजा हे गाव विकासाच्या बाबतीत आदर्श मानले जात असताना, ४८ लाखांच्या या पुलाच्या कामात केलेली 'माती' (घोटाळा/निकृष्ट काम) चर्चेचा विषय ठरली आहे. पुलाच्या कामाचा दर्जा पाहता, हे काम अत्यंत कमकुवत असल्याचे दिसून येत आहे. या प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. शासनाकडून मिळणारा निधी हा जनतेचा असून, तो कोणत्याही व्यक्तीच्या घरचा नसून जनहितार्थ आहे. मात्र, कंत्राटदाराच्या या कारभारामुळे शासकीय निधीचा अपव्यय होत आहे. एकदा काम पूर्ण झाले की त्यात पुन्हा बदल करणे कठीण असते. त्यामुळे, वेळ निघून जाण्याआधीच संबंधित विभाग आणि ग्रामस्थांनी या कामाकडे गांभीर्याने लक्ष देऊन दर्जेदार काम करून घ्यावे, अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा, भविष्यात काम पूर्ण झाल्यावर ओरडण्यापेक्षा आजच ठोस भूमिका घेणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे.

### कुटाणेखोर गुत्तेदारला राजकीय अभय

संबंधित गुत्तेदाराने हा रस्ता घाईगडबडीत केला पक्का फुल बांधण्याऐवजी मातीचा वापर अधिक झाल्याने तो रहदारीला येण्यापूर्वीच खेळ खेळा बनला असून समोर आलेल्या व्हिडिओ मधून एका लाखेत पुलाचा कठडा पडल्याचे दिसून आले विशेष म्हणजे या गुत्तेदाराने पूर्वी शासकीय जमिनीवर खडी क्रेशर सुरू करून शासनाचा महसूल बुडवल्याच्या तक्रारी आहेत

### अभियंत्याने चूक कबूल केली

जिल्हा परिषदेच्या निधी मधून केस अंबाजोगाई रस्त्यावरील मुख्य रस्ता ते बंद करांचा या गावाला जोडणाऱ्या नदीवरील पुलाचे बांधकाम बाबत अभियंता हातागळे यांनी झालेली चूक कबूल केली संबंधित गुत्तेदाराने पुलाच्या कठड्याला लोखंड वापरणे गरजेचे असताना ते वापरले गेले नाही उद्या प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली जाईल असे सांगण्यात आले

# आ. संदीप क्षीरसागर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश!

## बीडमधील अल्पसंख्याक मुलींच्या सुसज्ज वसतिगृहासाठी नगर विकास विभागाकडून जागा महसूल विभागाकडे प्रत्यार्पित

### उपमुख्यमंत्री व अल्पसंख्याक मंत्री सुनेत्राताई पवार यांचे मानले आभार

बीड । प्रतिनिधी

रमजान ईदच्या पर्वावर आमदार संदीप क्षीरसागर यांनी बीड शहरातील मुस्लिम व अल्पसंख्याक समाजाला दिलेल्या शब्दाला अखेर राज्य शासनाच्या अधिकृत मंजुरीचे बळ मिळाले आहे. बीड शहरात अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी स्वतंत्र आणि सुसज्ज वसतिगृह उभारण्याच्या मार्गातील जागेची अडचण आता पूर्णपणे दूर झाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने सोमवारी , दि.१३ जुलै २०२६ रोजी अधिकृत शासन निर्णय () जारी करून, बीड नगर परिषदेच्या मालकीची किल्ला मैदान येथील डाक बंगल्याची जागा महसूल



विभागाकडे प्रत्यार्पित करण्यास अंतिम मंजुरी दिली आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे बीड मतदारसंघासह जिल्ह्यातील अल्पसंख्याक विद्यार्थिनींच्या हक्काच्या निवासस्थानाचा प्रश्न कायमचा मार्गी लागला आहे.

अल्पसंख्यांक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी बीड शहरात एक सुसज्ज वसतिगृह असावे, जेणेकरून जिल्ह्यातील विद्यार्थिनींना याचा फायदा होईल, यासाठी आमदार संदीप क्षीरसागर यांनी शासनस्तरावर सातत्याने आणि आग्रही पाठपुरावा केला होता. त्यांच्या या प्रयत्नांमुळे सदर वसतिगृहाच्या बांधकामास निधीसह प्रशासकीय मंजुरी यापूर्वीच मिळाली होती. मात्र, शहराच्या मध्यवर्ती भागात योग्य जागा उपलब्ध न झाल्याने प्रत्यक्ष कामात अडथळा निर्माण झाला होता. यावर उपाय म्हणून आ. क्षीरसागर यांनी बीड शहरातील किल्ला मैदान परिसरातील नगर परिषदेच्या मालकीची, परंतु सध्या निकामी असलेल्या डाक बंगल्याची जागा सुचवली होती. ही जागा नगर विकास विभागाच्या अखत्यारीत असल्याने, ती प्रथम महसूल व वनविभागाकडे वर्ग करणे कायदेशीररित्या आवश्यक होते. दरम्यान, १२ सप्टेंबर २००९ रोजी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेमधील ठराव क्र.३४ नुसार सदरील नगरपरिषदेच्या मालकीची डाक बंगल्याची जागा अल्पसंख्याक मुलींच्या वसतिगृहासाठी देण्यास नगरपरिषदेने मंजुरी दिली होती. त्यानुसार सदरील जागेच्या महसूल विभागाकडे प्रत्यार्पणाची कार्यवाही तातडीने करण्याबाबत आ.क्षीरसागर यांनी चोख पाठपुरावा केला होता. त्यानुसार जारी झालेल्या शासन निर्णयानुसार (क्रमांक: एमयुएम-२०२५/प्र.क्र.४२९/नवि-१७), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक

# घरफोड़ी करून ६५ हजार रूपयांचा ऐवज लंपास

### ग्रामीण पोलिसांत अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील सुरडी नजीक येथे अज्ञात चोरट्याने घरफोडी करून सुमारे ६५ हजार ४०० किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.या प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार धर्मराज शेषेराव चौरै रा.सुरडी नजीक,यांच्या राहत्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश केला. घरातील लोखंडी धान्याच्या कोठीमध्ये स्टीलच्या डब्यात ठेवलेले सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले. चोरीस गेलेल्या ऐवजात दोन सोन्याच्या अंगठ्या, सोन्याचे गळ्यातील गाठण,सोन्याचे झुंबर,दोन लहान सोन्याच्या अंगठ्या, चांदीची लहान मुलांची कंबरेची साखळी तसेच सोन्याचा ओम असा एकूण ६५ हजार ४०० रुपये किमतीचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी लंपास केले.ही घटना दि.६ जुलै रोजी सकाळी १०:०० वाजण्याच्या सुमारास घडली असून,दि. १० जुलै रोजी सायंकाळी ४.०७ वाजता माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून, पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# जायकवाडी-बारभाई तांडा रस्त्यावरील पुलाची तातडीने दुरुस्ती करण्याची ग्रामस्थांची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे बारभाई तांडा येथील ग्रामस्थांनी जायकवाडी ते बारभाई तांडा रस्त्यातील नाल्यावरील पुलाची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, जायकवाडी-बारभाई तांडा रस्त्यातील नाल्यावरील पुलाचे नळे अज्ञात व्यक्तींनी उखडून नेल्याने पुलाची अवस्था धोकादायक



झाली आहे. पावसाळ्यात या पुलावरून ग्रामस्थांना जीव धोक्यात घालून ये-जा करावी लागत असून अपघाताचा धोका वाढला आहे.पुलाच्या नळ्यांची चौकशी करून तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.या निवेदनावर बाबासाहेब चव्हाण, राजेभाऊ राठोड, गणेश जाधव, आसाराम चव्हाण, विठ्ठल चव्हाण, अर्जुन पवार, मनोहर राठोड आणि हरिभाऊ चव्हाण यांच्यासह अनेक ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.ग्रामस्थांनी प्रशासनाने या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेऊन पुलाची दुरुस्ती करून नागरिकांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी केली आहे.

# मच्छिंद्रनाथ गडाचा सर्वांगीण विकास वेगात

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील आराध्य दैवत असलेल्या श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड येथे सुरू असलेल्या विविध विकासकामांची सोमवारी (दि. १३ जुलै) आमदार सुरेश धस आणि बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी संयुक्त पाहणी करून कामांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला. मंदिराचा भव्य जीर्णोद्धार, परिसर विकास तसेच भाविकांसाठी उभारण्यात येणाऱ्या विविध सुविधांची गुणवत्ता आणि नियोजनाची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.



आमदार सुरेश धस व जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची विकासकामांची पाहणी; गुणवत्तापूर्ण कामे व भाविक सुविधांवर भर

यावेळी आमदार सुरेश धस यांनी मच्छिंद्रनाथ गडाचा धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा जपत विकासकामे उच्च दर्जाची आणि निर्धारित मुदतीत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित विभागांना दिल्या. भाविकांना सुरक्षित, स्वच्छ आणि आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे हेच विकासकामांचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पाहणीदरम्यान मंदिराचा जीर्णोद्धार, परिसर सुशोभीकरण, रस्त्यांची उभारणी, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, अन्नदान छत्र, स्वच्छता

# आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेचा मान आयुक्त तुकाराम मुंडे यांना द्यावा -भाई थावरे

माजलगाव । प्रतिनिधी

यंदाच्या आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील शासकीय महापूजेचा मान आयुक्त तुकाराम मुंडे यांना देण्यात यावा, अशी मागणी शेतकरी नेते तथा शेतकरी संघर्ष समितीचे भाई गंगाभिषण थावरे यांनी केली आहे.



यासंदर्भात मुख्यमंत्री व संबंधित प्रशासनाला निवेदन देण्यात आले असून, त्यामध्ये तुकाराम मुंडे हे कर्तव्यदक्ष, निस्वार्थी व सर्वसामान्यांच्या प्रश्नांप्रती संवेदनशील अधिकारी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. महाराष्ट्रात त्यांनी विविध जबाबदाऱ्या सांभाळताना जनहिताचे निर्णय घेतले असून, सध्या दूध, औषधे आणि अन्नपदार्थांमधील भेसळ उघडकीस आणण्यासाठी सुरू असलेल्या कारवाईमुळे जनजागृती होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. शेतकरी संघर्ष समितीच्या बैठकीत एकमुखी ठराव करून यंदाच्या आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेचा मान तुकाराम मुंडे यांच्या हस्ते व्हावा, अशी भूमिका घेण्यात आल्याचे भाई गंगाभिषण थावरे यांनी सांगितले. तुकाराम मुंडे हे शेतकरी कुटुंबातील असून, सामान्य शेतकऱ्याच्या मुलाने आपल्या कर्तृत्वाच्या बळावर उच्च प्रशासकीय पद गाठले आहे. त्यांच्या कार्याचा सन्मान म्हणून त्यांना हा मान देण्यात यावा, अशी विनंतीही निवेदनातून करण्यात आली आहे.

# बीड नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा तहकूब

## मंजूर आणि चालू कामांची माहिती न दिल्याने भाजप, रा.काँ. शरदचंद्र पवार पक्ष आक्रमक

बीड य प्रतिनिधी

बीड नगरपरिषदेची आज आयोजित करण्यात आलेली सर्वसाधारण सभा प्रचंड गोंधळ आणि विरोधकांनी घेतलेल्या आक्रमक पवित्र्यामुळे अखेर तहकूब करण्यात आली आहे. नगरपरिषद प्रशासनाकडून पूर्वी मंजूर झालेले ठराव, सध्या शहरात सुरू असलेले विकासकामं आणि निविदा याची कोणतीही स्पष्ट माहिती न दिल्याने भाजपसह रा.काँ. शरदचंद्र पवार पक्षाचे नगरसेवक आक्रमक झाले.



सभा तहकूब झाल्यानंतर नगरपरिषद परिसरामध्ये पत्रकारांशी बोलताना भाजपच्या गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी प्रशासकीय कारभारावर ताशेरे ओढले. त्या म्हणल्या, आज बीड नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा तहकूब झाली आहे. याला कारणीभूत म्हणजे बीड नगरपालिकेचा सध्या सुरू असलेला गलथान आणि मनमानी कारभार आहे. जेव्हा स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभा घ्यायची असते, तेव्हा मागील बैठकीतील

### भाजपसह रा.काँ.शरदचंद्र पवार पक्ष एकत्र वज्रमूठ

या आंदोलनात विरोधकांनी नगरपालिका प्रशासनाविरोधात मोठी एकजुट दाखवली. डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासोबत रा.काँ. शरदचंद्र पवार पक्षाचे गटनेते खुर्शीद आलम आणि दोन्ही पक्षांचे सर्व नगरसेवक या लढ्यात एकत्र आले होते. बीडच्या नागरिकांवर पारदर्शकता नसलेले कोणतेही काम लादले जाऊ नये आणि प्रत्येक काम हे पूर्णपणे पारदर्शक) राहिले पाहिजे, हाच या तहकुबीमागचा मुख्य उद्देश असल्याचे विरोधकांनी सांगितले. दरम्यान, येत्या ७ ते ८ दिवसात होणाऱ्या पुढील बैठकीत प्रशासन सर्व सविस्तर माहितीसह उपस्थित राहील आणि एक 'आदर्श विरोधी पक्ष' म्हणून आम्ही प्रशासनाला जाब विचारत राहू, असा विश्वास डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केला.

# बीड येथे जनगणनेसाठी ओबीसीनी आवळली एकजुटीची वज्रमुठ

## राज्यव्यापी ओबीसी जनगणना यात्रा काढणार ! - कल्याण आखाडे

बीड । प्रतिनिधी

अनुसूचित जाती (एससी) व अनुसूचित जमाती (एसटी)प्रमाणेच ओबीसींचीही जातीनिहाय जनगणना झालीच पाहिजे, या प्रमुख मागणीसाठी राज्यभर व्यापक जनआंदोलन उभारण्याच्या उद्देशाने सावता परिषदेच्या वतीने आयोजित ओबीसी जनगणना चर्चासत्र बीड शहरातील अमृत मंगल कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. विविध ओबीसी संघटनांचे प्रमुख, जिल्हाध्यक्ष व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेले हे चर्चासत्र आंदोलनाला नवी दिशा देणारे, संघटनात्मक एकजूट दर्शविणारे आणि आगामी लढ्याची रणनीती निश्चित करणारे ठरले. चर्चासत्रात ओबीसी समूहातील विविध जातींच्या सुमारे ८० समाज संघटनांचे २८० प्रमुख पदाधिकारी सहभागी झाले होते. अनेक प्रतिनिधींनी चर्चेत सक्रिय सहभाग घेत विविध सूचना मांडल्या. ओबीसी जनगणनेसाठी अधिक व्यापक व तीव्र आंदोलन उभारण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

चर्चासत्राचे निमंत्रक सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे म्हणाले की, हा लढा कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा सरकारच्या विरोधात अथवा समर्थनार्थ नसून ओबीसी समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी आहे. जनजागरण आणि जनआंदोलन या दोन्ही आघाड्यांवर प्रभावीपणे कार्य करण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहन करत राज्यभर 'ओबीसी जनगणना यात्रा' काढण्याचा निर्धार त्यांनी जाहीर केला. यावेळी ओबीसी प्रवर्गाच्या प्रश्नांवर प्रा. सुशीलाताई मोराळे, बालाजीराव शिंदे, कल्याणराव दळे, गुफ्रान अन्सारी, प्रा. विष्णू जाधव, इंजि. व्ही. व्ही. बन, डॉ. शिवाजीराव राऊत, बालासाहेब दोडतले, प्रा. पी. टी. चव्हाण आणि डॉ. लक्ष्मण जाधव यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या भाषणांमुळे चर्चासत्राला वैचारिक उंची लाभली.

राज्यातील खासदारांना घेराव घालून निवेदने देणे, राज्यव्यापी स्वाक्षरी अभियान राबविणे, राष्ट्रपती, प्रधानमंत्री व मुख्यमंत्री यांना ओबीसी जनगणना मागणीचे ई-मेलद्वारे पाठविणे , तसेच तालुका, जिल्हा पातळीवर धरणे- आंदोलने, मोर्चे आणि जनजागृती अभियान राबविण्याबाबत एकमताने निर्णय घेण्यात आला आहे.

यावेळी लक्ष्मण ढवळे, शालिनी बुंधे, युवराज शिंदे, शरद भांडेकर, विष्णू देवकते, अर्जुन दळे, प्रकाश कानगावकर, गंगाधर पुरी, रमेश कैवाडे, सुधीर जाधव, परमेश्वर वाघमोडे, बापूराव भालेकर, बप्पा घुगे, रफिक बागवान, प्रकाश कोंका, अर्जुन बहिरवाळ, लक्ष्मण गुंजाळ, राजेंद्र जव्हेरी, गणेश जगताप, गणेश पुजारी, सय्यद साजेदभाई, सादेकभाई




अंबानी, शेख जाकेरभाई, मीनाक्षी देवकते, सुघोष मुंडे, अनिल मुळेकर, राजू ताटे, राजेश शिंदे, दगडू गायकवाड, अभय बिडकर, भूषण पवार, रमेश राऊत, मंगेश लोळगे, संभाजी गुरव, लहू गव्हाणे, अविनाश शिंगनाथ, अजिंक्य आनेराव, विशाल राऊत, सुरेश असलेकर, हाशमभाई बागवान, हारुणभाई बागवान, बंडू खांडेकर, सुरेंद्र कावरे, संजीवनी राऊत, दगडू म्हेत्रे, दिनेश

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26